**RAINFALL:**-The average annual rainfall is 60 Cms. The distribution of rainfall is uneven and unreliable; therefore, Dhule district comes under **"Drought proneregion"**. The district receives most of the rainfall from south-west monsoon. The western region receives more rainfall from west monsoon. The western region receives more rainfall as it is located on higher elevation where as Shirpur, Shindkheda and Dhule receives comparatively low rainfall.

**AIMS AND OBJECTIVE**

1. To study the impact of physical and socio-economic factors on the general land use in the study region.
2. To study the aerial changes in general land use pattern in the study region.
3. To study the temporal changes in general land use pattern from 2001 and 2011 in the study region.

**DATA BASE AND METHODOLOGY**

For the present study data is obtained from secondary sources. Such as District census handbook, Economic review, Agriculture epitomes, Gazetteers, Season and crop reports published by the department of agriculture. Collected data is processed and presented in the form of percentage. Processed data is represented through cartographic technique.

**LAND USE**

Tehsilwise trends in general land use pattern in study region is shown in Table no. 01. and Fig. No 01 to 05, with this generalized picture of general land use pattern of the Dhule district, a detailed analysis of the same is given below.

1. **Area under Forest**

In Dhule district 208890 hectares of land under forest in 2001. It is accounted for 27.61% of total geographical area of the region. The area under remain equal from 2001 to 2011


Copyright © 2020Authors

ISSN:2320-0693
Vol-19-Issue-54-June-2020

during the investigation period. Table No. 1 shows that there is variation in forest area from tehsil to tehsil. The lowest area under forest was found in Shindkhedatehsil (12.16%), whereas the highest area under forest in Shirpur tehsil (40.75%) during the 2001 to 2011.

The Sakri and Dhule tehsil was 30.18% and 27.35 % forest cover respectively during 2001 to 2011. The tehsil wise distribution of the study region varies from 12% to 40%. And the area under forest in tehsil varies from place to place. The north-eastern part of Sakri tehsil and north-eastern part of Shirpur tehsil have more proportion of the forest area due to mountainous region and high amount of rainfall. The lowest proportion of forest is found in Shindkhedatehsil. Here the proportion of area under forest are only 12.16%, thistehsil comes under drought prone region.No positive or negative change in forest area was in the study region from 2001 to 2011.

Table No. 01

| Tehsil | Shirpur | | | Shindkheda | | | Sakri | | | Dhule | | | Dhule district | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 2001 | 2011 | % change | 2001 | 2011 | % change | 2001 | 2011 | % change | 2001 | 2011 | % change | 2001 | 2011 | % change |
| Area under forest | 40.75 | 40.75 | 00 | 12.16 | 12.16 | 00 | 30.18 | 30.18 | 00 | 27.35 | 27.35 | 00 | 27.61 | 27.61 | 00 |
| Land not available for cultivation | 4.49 | 10 | 5.51 | 4.73 | 2.37 | -2.36 | 3.62 | 11.73 | 8.11 | 4.16 | 6.36 | 2.2 | 4.25 | 7.61 | 3.36 |
| Uncultivable land (excluding follow land) | 0.91 | 14.65 | 13.74 | 4.69 | 11.31 | 6.62 | 8.89 | 10.6 | 1.71 | 1.69 | 2.17 | 0.48 | 3.86 | 9.68 | 5.82 |
| Fallow land | 3.48 | 0 | -3.48 | 3.17 | 4.04 | 0.87 | 4.23 | 1.78 | -2.45 | 4.70 | 9.08 | 4.38 | 3.89 | 3.72 | -0.17 |
| Net sown area | 50.37 | 34.6 | -15.77 | 75.25 | 70.13 | -5.12 | 53.08 | 45.58 | -7.5 | 62.1 | 55.04 | -7.06 | 60.21 | 51.33 | -8.88 |

Source- Computed by the Author

## 2. Area not available for cultivation

About 4.25% of land was not available for cultivation in the study region in the year 2001. In the year 2011 about 7.61% of land of the total geographical area came under this category. It was increased by 3.36% in this period. The proportion of area not available


Copyright © 2020Authors

*Tathapi*
**(UGC Care Journal)**
ISSN:2320-0693
Vol-19-Issue-54-June-2020

for cultivation is differing from tehsil to tehsil. The highest proportion of area not available for cultivation in Shindkheda tehsil is 4.73% in 2001. Because this tehsil suffer from lack of irrigation and sandy soil etc. while it is lowest in Sakri tehsilit was 3.62%. The Shirpur and Dhule tehsil land not available for cultivation was 4.49% and 4.16% respectively in 2001.

The negative change was experienced in area not available for cultivation over all tehsil except Shindkheda tehsil during the investigation period. Only Shindkheda tehsil noticed positive change is -2.36% in area not available for cultivation. Above 2% geographical area under this category in Dhule tehsil (2.2%) in the last ten years period. Above 5% to 8% area was found under area not available for cultivation is Shirpur (5.51%) and Sakri (8.11%) tehsils.

**3. Uncultivable land (excluding follow land)**

In 2001 3.86% land was uncultivable waste in the study region. The positive change shows in the district is up to 5.82% in the investing period. It means that the uncultivable land was increased by 5.82% during the period of ten years. The uncultivable land was positive change all tehsils in the study region. The highest area under uncultivable land was found in Sakri tehsil (8.89%) whereas the lowest uncultivable land was noticed in Shirpur tehsil (0.91%) in 2001. Out of total geographical area was under uncultivable land in Sindkhede (4.69%) and Dhuletehsil (1.69%) in 2001.Table No.1 shows that in the year 2011 was the highest proportion of under uncultivable land the Shirpur tehsil was highest (14.65%) while the Dhule tehsil (2.17%) is lowest. The remaining are Sakri and Shindkhedatehsil is 10.6% and 11.31% respectively.

**4. Fallow Land**

Fallow land can be divided into current fallow and other than current fallow. The current fallow indicates the land left fallow during the current year only and other than current fallow means land left fallow temporarily out of cultivation for a period of more than one year. In the region under study about 2.74% land was left as current fallow, while about 1.15% land was under other than current fallow land. In the year 2001, 3.89% land under fallow land in the Dhule


Copyright © 2020Authors

ISSN:2320-0693
Vol-19-Issue-54-June-2020

district. The proportion of fallow land is varies from tehsil to tehsil. Out of total geographical area below 5%area was found under fallow land in the study region. The highest proportion of land under fallow land is 4.70% in Dhule tehsil, whereas the lowest proportion of fallow land is 3.17% in Shindkhedatehsil. In the year 2011, 3.72% land under fallow land in the study region. It is minor negative change is -0.17% in the study region. In this year two tehsil was shows negative change such as Shirpur (-3.48%) and Sakri tehsils (-2.45%). While two tehsils experienced is positive change like Shindkheda (0.87%) and Dhule tehsils (4.38%).

**5. Net Sown Area**

One of the most significant features of land use in the study region is the large proportion of area under cultivation. Out of total geographical area 60.21% area was under cultivation in 2001. This shows the dominance of agriculture in the economy of the region.

Net sown area was decreased from 60.21% to 51.33% during the period of ten years. Below 55% total geographical area was experienced under net sown area in Shirpur (50.37%) and Sakri tehsils. Whereas above 55% net sown area was found in Shindkheda (75.25%) and Dhule tehsils (62.1%) in the year 2001. Below 8% negative change in net sown area was found Shindkheda (-5.12%), Sakri (-7.55%) and Dhule (-7.06%) tehsils. The highest negative change in net sown area in Shirpur (-15.77%) tehsil from 2001 to 2011.The tehsil wise spatial distribution of area under net sown indicates that proportion of cultivated land is more than 50% in everytehsil. However, the area around the western, southern and north-eastern boundary of the district shows low proportion of net sown area under cultivation due to hilly terrain, infertile soil and forest cover.





Copyright © 2020Authors

ISSN:2320-0693
Vol-19-Issue-54-June-2020

Fig. No. 01




Fig. No. 02




Fig. No. 03





Copyright © 2020Authors

ISSN:2320-0693
Vol-19-Issue-54-June-2020

Fig. No. 04




Fig. No. 05

**Conclusion**

Due to the physiography and location of the study region the general land use pattern of the region under study varies from tehsil to tehsil. The present land use pattern appears to have been resulted from a process of land exploitation within frame of physio-socio-economic complex and modified by the expansion of irrigation and the population growth.Table No. 1 presents that no positive or negative change in land under forest found in the study region from 2001 to 2011. The positive change in area not for cultivation in all tehsils except Shindkhedatehsil. It was shows negative change. The land under cultivable waste noticed positive change in the study region. In this category Shirpurtehsil (13.74%) shows highest proportion while Dhule tehsil (0.48%) experienced lowest proportion. Net sown area was decreased by -5.12% to -15.77% in study region, because of population growth. So, it is important to bring fallow land under cultivation within the short period.


Copyright © 2020Authors

83



ISSN:2320-0693
Vol-19-Issue-54-June-2020

**References**

1. Das M. M. (1981): Land use pattern in Assam, Geographical review of India, Vol.43, No. 3, Pp. 243-244
2. Singh Jasbir(1974): An agriculture atlas of India-A Geographical analysis, Vishal publication, Kurukshetra, India, Pp. 139.
3. Socio-economic abstract of Dhule district 2001 to 2011.
4. District census handbook, Dhule district 2001 and the C.D. of district census handbook-Dhule district 2011.
5. Patil S.B.(2009) Geomorphology and settlements in Dhule district , unpublished Ph.D. thesis submit to K.B.C.N.M.U., Jalgaon.
6. Nandre H.S. and Patil S.B. (2019) "Geographical analysis of Medium irrigation projects in Dhule district(M.S.) "Vol – 04 , Issue 2 (Part - 2) May- 2019, Pp E -97- E 100
7. Nandre H.S. , Patil S.B. and Masule Yogesh (2019) " An assessment of Irrigation projects in Panzara basin Dhule district" Research Journey, Special issue 100 Jan. 2019. Pp – 107-110.



Copyright © 2020Authors

2020-21 (155)

RNI MAHMAR.43768/18/12/2013.TC

ISSN No. 2454-8731 MONTHLY REFEREED JOURNAL

# Rankranti Multidisciplinary Research Journal




*Chief Editor*
**Dr. Umesh B. Pujari**

*Executive Editor*
**Dr.. Amit H. Raut**

ATTESTED BY
PRINCIPAL
A.D.M.S.P. Sanstha's
Late Annasaheb P.L. ...
Arts & Science College ...

Vol.6, Issue : VI, June, 2020

Chaitanya Prakashan, Nanded - 431606

Contact: 9763308333, 9011107939,

email – rmrjournal@gmail.com

Rankranti Multidisciplinary Research Journal ISSN: 2454-8731

Vol.6, Issue : VI.
JUNE 2020

Chaitanya Prakashan &
Rankranti Multidisciplinary Research Journal

चैतन्य प्रकाशन व रणक्रांती मल्टीडिसिप्लेनरी रिसर्च जरनल

© All Copy Right Reserve to Publication

ISSN NO. 2454 - 8731

RNI
MAHMAR.43768/18/12/2013.TC

Address
Snehanand Nivas Nanded
431606

Contact:
9763308333, 9011107939

Email -
rmrjouranal@gmail.com

Printers:

Price: Free

PRESIDENT OF EDITORIAL BOARD & REVIEW COMMITTEE

Dr. Saheb Khandare

Practitioners of folklore and abstract culture

| Guidance | Guidance |
| --- | --- |
| Dr. Narendra Deshmukh<br>S. P. Pune Univrsity, Pune | Dr. H. J. Narke<br>Principal, V.P.S.P's Art, Commerce & Science College, Kannad Aurangabad |

EDITORIAL BODY

| | |
| --- | --- |
| Dr. Pramod Padwal<br>Banras Hindu Univarsity, Varansi<br>Uttar Pradesh | Dr. Sanjay Karndikar<br>The Maharaja Sayajirao University of Baroda, Baroda, Gujrat |
| Dr. Sneha S. Mahambre<br>Government College, Sankhli, Goa | Dr. Taher Pathan<br>Alighar Muslim University Alighar, Uttar Pradesh |
| Dr. Manik Chavan<br>Gulbarga University, Kulbargi - 585106, Karnataka | Dr. Manisha S. Nesarkar<br>Rani Chennamma Univerisy Belgavi Karantka |

| | | |
| --- | --- | --- |
| Pri. Dr. Rashmi Gupta<br>Gyaneshwari Shiksha Mahavidyalay Dindori, M.P. | Dr. Vitthal H. Jambale<br>Swami Ramanand Teerth Marathwada. University, Nanded, Dist. Nanded | Dr. Z. A .Pathan<br>Art's, Comm. & Science College, Badnaprur Dist. Jalna |

(138)




| | | |
|---|---|---|
| **Dr. Prashant Sonvne**<br>KBC North Maharashtra University, Jalgoan, Maharashta | **Dr. Datta P. Hingmire**<br>Konkan Gyanpeeth Uran College of Comm. & Art's, Uran-Raigad, Dist. Raigad | **Dr. Umesh Mundhe**<br>Rashtramata Indira Gandhi Mahavidyaly, Jalna Dist. Jalna |
| **Prin. Dr. Dada Markad**<br>Shri Harihareshwar Art's & Science College, Koradgoan, Tq. Pathardi, Dist. Ahamadnagar | **Principal. Dr. Chandu K. Poptkar**<br>Kumbhalkar College of Social-work, Wardha Tq. & Dist. Wardha | **Dr. Changdeo Mundhe**<br>Godawri Arts Jr. & Sr. College, Ambad Dist. Jalna |
| **Dr. Kalidas M. Bhange**<br>A. B. Mahavidyalay Devgoan Rangari, Aurangabad | **Dr. Milind B. Bachute**<br>R.C.Patel College Shirpur, Dist. Dhule | **Dr. Sajay Kumar Panchal**<br>Chief Editor Sahitya Sudha Research Journal |

REVIEW COMMITTEE

| | | |
|---|---|---|
| **Dr. Ramchandra M. Bhise**<br>Digmbar Bindu Mahavidyalay, Bhokar S. R.T.M. U. N., Dist. Nanded | **Dr. Sharad Meshram**<br>S. S. Jaiswal College Arjuni-Morgoan Gondia Dist. Gondia | **Asst. Prof. Madan Jadhav**<br>Godawri Arts Jr. & Sr. College, Ambad Dist. Jalna |
| **Dr. Maroti Tegampre**<br>Godawri Arts Jr. & Sr. College, Ambad Dist. Jalna | **Asst. Prof. S. P. Gutte**<br>Shivaji College Kandhar, Tq. Kandhar Dist. Nanded | **Dr. D. N. Raut**<br>Shahid Bhagat Singh College Killari, Dist. Laur |
| **Dr. M.R. Kadam**<br>Shivaji College Kandhar, Tq. Kandhar Dist. Nanded | **Dr. N. V. Singapure**<br>Sharda College, Parbhani, Dist. Parbhani | **Dr. N. M. Palwade**<br>B. Raghunath College, Parbhani, Tq. & Dist. Parbhani |
| **Dr. Ganesh V. Lokhande**<br>R. B. O. Narayanrao Borake College, Shrirampur, Dist. Ahamadnagar | **Dr. Umakant S. Gaikwad**<br>Art's & Science College Chincholi, (Li) Tq. Kannad, Dist. Aurangabad | **Dr. Devanand Ambhure**<br>Saraswati Social- Work College, Washim Tq. Washim, Dist. Washim |




Contact: 9763308333, 9011107939, rmrjournal@gmail.com

Rankranti Multidisciplinary Research Journal ISSN: 2454-8731

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | संशोधन विषय | लेखकाचे नाव | पान क्र. |
|---|---|---|---|
| 1 | स्थानिक इतिहास – नाशिक | डॉ. छाया भास्कर भोज | 01-06 |
| 2 | ग्रामगीतेतील जीवनमूल्ये विषयक विचार | कु. गोदावरी विठ्ठलबन बन | 07 - 14 |
| 3 | र. धो. कर्वे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर | डॉ. हरेश संपत शेळके | 15 - 26 |
| 4 | भारतीय कृषी क्षेत्र व पिक विमा संरक्षण | प्रा. डॉ. ठाकूर विलास तु. | 27 - 30 |
| 5 | ऊसतोड महिला कामगार व शासकीय धोरण | प्रा. महादेव चैतराम चुंचे | 31 - 37 |
| 6 | गांधीवाद आणि मराठी साहित्य | डॉ. अतुल नारायण चौरे | 38 - 43 |
| 7 | भारतातील जाती प्रथेच्या उगमा बद्दल डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेली समिक्षा | प्रा. रमाकांत अंबादास चौधरी | 44 - 47 |
| 8 | भारत आणि अमेरिका व्यापारी संबंध सन 2019 – 20 | डॉ. रोडगे कैलास, डॉ. भोंडवे अंगद | 48 - 51 |
| 9 | ग्रामगीतेतील तुकडोजींचे शैक्षणिक विचार | मोहूर्ले एस. आर | 52 - 62 |
| 10 | महामारी कोरोना आणि सामाजिक समस्या | प्रा. डॉ. खेमराज वसंत पाटील | 63 - 68 |
| 11 | राष्ट्रीय चर्चासत्र (परिषद) शेतकरी व हरितक्रांती | राजपूत गणेश आसाराम | 69 - 71 |
| 12 | संत सोपानदेव यांच्या अभंगातील अलंकार सृष्टी | डॉ. राजेंद्र मुंढे | 72 - 81 |
| 13 | स्त्रिवादी मराठी साहित्य प्रवास : एक दृष्टीक्षेप | प्रा. साजिद के. शाह | 82 - 89 |
| 14 | मुंबईतील कामगार चळवळीचा केंद्रबिंदू, डॉ. दत्ता सामंत : चिकित्सक अभ्यास | डॉ. सौ. वंदना राजेश शिंदे | 90 - 101 |
| 15 | गडचिरोली जिल्ह्यातील माडिया आदिवासींचे लोककथा संकलन, संशोधन आणि साहित्यिक मुल्यमापन | प्रा. गजानन जंगमवार | 102 - 108 |
| 16 | पर्यटनाचा पर्यावरणावर होणारा परिणाम | डॉ. राजेंद्र बगाटे | 109 - 120 |
| 17 | ग्रामीण विकास : एक धोरणात्मक अभ्यास | डॉ. वैशाली पेरके | 121 - 127 |
| 18 | ग्रामीण साहित्याची वाटचाल | डॉ. प्रज्ञा रा. निनावे | 128 - 135 |
| 19 | हरित पर्यावरण साधक वर्तनाच्या सद्य:स्थितीचा अभ्यास | डॉ. मनोज कांता बोराटे | 136 - 144 |
| 20 | भारतीय लोकशाहीपुढील आव्हाने | डॉ. राजेश सुभाष चालीकवार | 145 - 150 |
| 21 | बहिणाबाईंची निसर्ग जाणीव : एक चिंतन | डॉ. दत्ता रुस्तुमराव शिंदे | 151 - 154 |




Contact: 9763308333, 9011107939, rmrjournal@gmail.com

Rankranti Multidisciplinary Research Journal ISSN: 2454-8731

अनुक्रमणिका


| अ.क्र. | संशोधन विषय | लेखकाचे नाव | पान क्र. |
|---|---|---|---|
| 22 | भारताचे अलिप्ततावादी धोरण आणि यशवंतराव चव्हाण | डॉ. बाबासाहेब त्रिंबक मोताळे | 155 - 165 |
| 23 | महाराष्ट्रातील बांधकाम कामगारांच्या योजनांचा अभ्यास | डॉ. शिवाजी पाते व गंगाधर गायकवाड | 166 - 175 |
| 24 | आचार्य रजनीश 'ओशो' : एक झंझावात | डॉ. अनिल होपचे | 176 - 183 |
| 25 | पंढरीच्या वाटेवर एक : समीक्षण | डॉ. प्रशांत सूर्यवंशी | 184 - 190 |
| 26 | जीवन ज्योती सावित्रीमाई एक शैक्षणिक व सामाजिक क्रांतिज्योत | प्रा. शि. जाधव मनीषा | 191 - 196 |
| 27 | हंसा वाडकर यांचे 'सांगते ऐका' एक वास्तववादी आत्मचरित्र | प्रा. संजय आगलावे | 197 - 201 |
| 28 | 'स्वरभास्कर' चरित्राचे स्वरूप चरित्रातून घडणारे संस्कृती दर्शन | प्रा. तेलोरे मनोज बापुसाहेब | 202 - 209 |
| 29 | अमर्त्यसेन यांचे कल्याणाचे अर्थशास्त्र | डॉ. एन. सी. पवार | 210 - 216 |
| 30 | कोरोना विषाणूच्या प्रतिबंधासाठी आरोग्य वर्तन आणि सुधारित जीवनशैलीचे महत्व | डॉ. गणेश लोखंडे | 217 - 223 |
| 31 | लोकप्रिय कादंबरी | डॉ. प्रतिमा शंकर घान–सोनी | 224 - 229 |
| 32 | विविध भाषेतील शैक्षणिक अपरिहार्यता व सहसंबंध | डॉ. ज्ञानदेव नेमाजी राऊत | 230 - 240 |
| 33 | संगीत म्हणजे जीवनाचा प्राण | शिवराज दत्तराव शिंदे | 241 - 244 |
| 34 | काळजी व संरक्षणाची गरज असलेले बालक, समित्या व बालकांचे हक्क | डॉ. सुनिता तुकाराम राठोड | 245 - 250 |
| 35 | वर्तनवादी मानसोपचार पध्दती आणि मानसिक आरोग्य | डॉ. अमित ह. राऊत, डॉ. नागोराव मा. पाळवदे | 251 - 256 |
| 36 | आद्य कृषिवैज्ञानिक महर्षि पाराशर : एक चिंतन | प्रा. डॉ. उमेश भ. पुजारी | 257 - 263 |
| 37 | ग्रामीण विकाससंदर्भात महात्मा गांधीचे विचार | प्रा. डी. पी. कांबळे | 264 - 269 |
| 38 | तुकडोजी महाराजांच्या दृष्टीतील ग्रामराज्य | डॉ. देवमन दत्तुजी कामडी | 270 - 279 |


वरील संशोधन पत्रिकेतील सर्व लेखन किंवा मताशी प्रकाशक, मुद्रक, संपादक, संपादक समिती सदस्य आणि प्रकाशनाच्या सर्व समितीचे सर्व सदस्य सहमत असतील असे नाही. वरील संशोधन लेखाची जबाबदारी ही त्या - त्या लेखकांची असेल. जर कुणाला प्रकाशनाची काही हरकत असेल तर त्यांची न्यायालयीन कार्यक्षेत्र नांदेड असेल.

Rankranti Multidisciplinary Research Journal ISSN: 2454-8731

# भारताचे अलिप्ततावादी धोरण आणि यशवंतराव चव्हाण

**प्रा. डॉ. बाबासाहेब त्रिंबक मोताळे,**
सहाय्यक प्राध्यापक- राज्यशास्त्र विभाग,
स्व.अण्णासाहेब आर.डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालय,
म्हसदी, ता. साक्री, जि. धुळे.

**सारांश (Abstract)**

नवस्वतंत्र भारताने आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या द्विध्रुवीकरणाच्या पार्श्वभूमीवर भारताचे प्रथम पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी अलिप्ततावादी धोरणाचा स्वीकार केला. या अलिप्ततावादी धोरणानुसार भारताचे परराष्ट्र धोरण आखण्यास स्वातंत्र्यापासून प्रारंभ झाला. अलिप्ततावादी धोरणामुळे जगाची सरळ-सरळ दोन गटात विभागणी होण्यापासून बचाव झालेला होता. पंडित नेहरू यांच्या मंत्रिमंडळातील परराष्ट्र मंत्र्यांपासून प्रत्येक पंतप्रधानांच्या मंत्रिमंडळातील परराष्ट्र मंत्र्यांनी भारताच्या परराष्ट्र धोरणाची आखणी करतांना अलिप्ततावादी धोरणाचा स्वीकार केलेला आहे. यशवंतराव चव्हाण यांनी राष्ट्रीय स्तरावर विविध महत्त्वाच्या पदावर मोलाची भूमिका बजावलेली आहे. त्यांनी भारताचे परराष्ट्र मंत्री म्हणूनही महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडतांना आणि भारताचे परराष्ट्र धोरण ठरवतांना पंडित नेहरूंच्या अलिप्ततावादी धोरणाचा स्वीकार केला. यशवंतराव चव्हाण यांनीही अलिप्ततावादाचा स्वीकार करून भारताच्या परराष्ट्र धोरणाला एक ठोस दिशा दिली. त्यांनी भारताचे परराष्ट्र धोरण ठरवताना जागतिक शांततेचाही विचार केला. यशवंतराव चव्हाण यांचा शांततामय सहजीवनावर विश्वास होता. म्हणूनच त्यांनी अलिप्ततावाद या बहुउद्देशीय संकल्पनेला आपल्या परराष्ट्र मंत्री पदाच्या कार्यकाळात बळ देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. प्रस्तुत संशोधन लेखात भारताच्या अलिप्ततावादी धोरणाबाबत परराष्ट्रमंत्री म्हणून यशवंतराव चव्हाण यांनी बजावलेल्या भूमिकेचा

142



आणि अलिप्ततावाद या बहुउद्देशीय संकल्पनेविषयीच्या त्यांच्या दृष्टिकोणाचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**प्रस्तावना (Introduction):**

दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर जागतिक राजकारणाचे द्विध्रुवीकरण झाले होते. अमेरिका आणि रशियाप्रणित निर्माण झालेल्या गटबाजीमुळे जगातील अविकसित, विकसनशील आणि नवस्वतंत्र राष्ट्रांसमोर आव्हान निर्माण झालेले होते. या पार्श्वभूमीवर भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू, इजिप्तचे कर्नल नासेर आणि युगोसलावहियाचे मार्शल टिटो यांच्या प्रयत्नातून अलिप्ततावादी राष्ट्रांच्या तिसऱ्या गटाचा उदय आंतरराष्ट्रीय राजकारणात झाला. भारताने पंडित नेहरूंच्या माध्यमातून अलिप्ततावादी चळवळीचे नेतृत्व केले. भारताने या अलिप्ततावादी चळवळीनुसार आपले परराष्ट्रीय धोरण स्विकारले. भारताने आपल्या परराष्ट्र धोरणात अलिप्ततावादाचा आधार घेत ही चळवळ मजबूत करण्याचे कार्य केले. यशवंतराव चव्हाण यांनीदेखील परराष्ट्रमंत्री म्हणून भारताचे परराष्ट्र धोरण आखतांना अलिप्ततावादाला आदर्श मानूनच कार्यवाही केली. यशवंतराव चव्हाण यांनी पंडित नेहरूंप्रमाणेच अलिप्ततावादावर निष्ठा होती. तसेच अलिप्ततावादाशिवाय भारतासारख्या विकसनशील देशांना पर्याय नाही, असा विश्वास पंडित नेहरूंप्रमाणेच तत्कालीन परराष्ट्रमंत्री यशवंतराव चव्हाण यांना होता. प्रस्तुत संशोधन लेखात परराष्ट्र मंत्री असतांना यशवंतराव चव्हाण यांनी स्विकारलेल्या अलिप्ततावादी धोरणाचा तसेच अलिप्ततावादी धोरणासंदर्भातील त्यांच्या दृष्टिकोणाचा आढावा घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**मूळशब्द (Keywords):**
अलिप्ततावाद, परराष्ट्र धोरण, यशवंतराव चव्हाण, पंडित नेहरू, परराष्ट्रमंत्री, भारत, आंतरराष्ट्रीय शांतता, शांततामय सहजीवन, अविकसित, विकसनशील, विकास, आंतरराष्ट्रीय राजकारण, निशस्त्रिकरण इ.

**संशोधनाची उद्दिष्टे (Objectives of the research):**

१) भारताच्या अलिप्ततावादी धोरणाचा आढावा घेणे.

२) यशवंतराव चव्हाण यांनी स्वीकारलेल्या अलिप्ततावादी धोरणाचा अभ्यास करणे.

३) परराष्ट्रमंत्री म्हणून यशवंतराव चव्हाण यांनी स्विकारलेली अलिप्ततावादी भूमिका तपासणे.

**संशोधनाची गृहितके (Hypothesis of the research):**

१) यशवंतराव चव्हाण यांचा राष्ट्रांच्या शांततामय सहजीवनावर विश्वास होता.

२) परराष्ट्रमंत्री म्हणून यशवंतराव चव्हाण यांची भूमिका अलिप्ततावादी चळवळीशी निगडीत होती.

३) यशवंतराव चव्हाण यांचे परराष्ट्र धोरण अलिप्ततावादी होते.

**संशोधन पद्धती (Research Methodology):**

प्रस्तुत संशोधन लेखात ऐतिहासिक, वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आलेला आहे. याशिवाय काही संदर्भग्रंथांचाही आधार घेण्यात आलेला आहे.

**भारताचे अलिप्ततावादी धोरण आणि यशवंतराव चव्हाण यांची भूमिका:**

द्वितीय महायुद्धाच्या समाप्तीनंतर आंतरराष्ट्रीय राजकारणात दोन नवीन धरव उदयास आले. अमेरिकाप्रणित भांडवलशाही राष्ट्रांचा एक गट तर रशियाप्रणित साम्यवादी राष्ट्रांचा दुसरा गट अशी जगाची सरळ-सरळ दोन परस्परविरोधी विचारसरणी असणाऱ्या गटांमध्ये विभागणी झाली. आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या या द्विध्रुवीकरणात अविकसित, मागास, नवस्वतंत्र राष्ट्र भरडली जाण्याचा मोठा धोका निर्माण झाला होता. अशा राष्ट्रांना अमेरिका वा रशियाप्रणित कोणत्याही एका गटात सहभागी होणे धोकादायक तसेच स्वत्व गमावून बसवण्यासारखे होते. म्हणून पंडित नेहरू, मार्शल टिटो व कर्नल नासेर या त्रयींनी अलिप्ततावादाची नवीन संकल्पना मांडली. पंडित नेहरू "आशिया-आफ्रिका खंडातील सर्व

Rankranti Multidisciplinary Research Journal ISSN: 2454-8731

उदयोन्मुख राष्ट्रांच्या आंतरराष्ट्रीय संबंधातील स्वातंत्र्याची मोजपट्टी"[01] म्हणून अलिप्ततावादी संकल्पनेकडे बघत होते. आशिया-आफ्रिका खंडातील विकसित नवस्वतंत्र राष्ट्रांचे महत्प्रयासाने मिळालेले स्वातंत्र्य सुरक्षित ठेवण्यासाठी जगातील अमेरिका वा रशियाच्या नेतृत्वाखालील कोणत्याही एका गटात सामील न होता तटस्थपणे स्वतंत्र राहण्यासाठी अलिप्ततावादी धोरणच सर्वोत्तम असल्याचे पंडित नेहरूंचे ठाम मत होते. "अलिप्ततावाद हे नेहरूंच्या परराष्ट्र धोरणाचे एक सूत्र होते."[02] पंतप्रधान म्हणून पंडित नेहरूंनी भारताचे नेतृत्व करतांना भारताच्या परराष्ट्र धोरणाला निश्चित आकार देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. ही भूमिका पार पाडताना त्यांनी अलिप्ततावादाचा स्विकार केला. पंडित नेहरूंच्या नंतर पंतप्रधानपदावर आलेल्या प्रत्येक व्यक्तीने भारताचे परराष्ट्र धोरण ठरवतांना अलिप्ततावादी धोरणाचा आधार घेतला. त्याचप्रमाणे प्रत्येक परराष्ट्र मंत्र्यांची भूमिकादेखील परराष्ट्र धोरण ठरवतांना अलिप्ततावादाला अनुसरूनच राहिलेली आहे. स्व. यशवंतराव चव्हाण यांनी राष्ट्रीय राजकारणात पदार्पण केल्यानंतर संरक्षणमंत्री, गृहमंत्री, परराष्ट्रमंत्री, उपपंतप्रधान, अर्थमंत्री, लोकसभेचे विरोधी पक्ष नेते, 8 व्या वित्त आयोगाचे अध्यक्ष इ. विविध पदांवर महत्त्वाची भूमिका बजावली. यशवंतराव चव्हाण यांनी परराष्ट्रमंत्री म्हणून कार्य करतांना आणि भारताच्या परराष्ट्र धोरणाची आखणी करतांना अलिप्ततावादी धोरणाचा अवलंब स्वतंत्रपणे केला. स्व. यशवंतराव चव्हाण यांनी अलिप्ततावाद आंतरराष्ट्रीय राजकारणात महत्त्वाचे असल्याचे सांगताना म्हटले आहे की, "अलिप्ततावादी राष्ट्रे कुठल्याही एका मोठ्या राष्ट्राचा कोणत्याही प्रकारचा अग्रहक्क व नेतृत्व मान्य करत नाहीत. अलिप्ततावादी राष्ट्रांच्या या विचाराच्या सामर्थ्याची बूज राखली गेली पाहिजे."[03] आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या व्दिध्रुवीकरणाच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेल्या अलिप्ततावादी चळवळीतील सहभागी राष्ट्र दोन्ही गटाचे नेतृत्व न स्विकारता स्वतःचे स्वत्व, सामर्थ्य आणि स्वातंत्र्य सुरक्षित ठेवण्यात अलिप्ततावादी विचारांमुळे यशस्वी होतील, यावर यशवंतरावांचा विश्वास होता. "यशवंतराव चव्हाण यांनी आपल्या परराष्ट्र मंत्रीपदाच्या काळात

Rankranti Multidisciplinary Research Journal ISSN: 2454-8731

गटनिरपेक्ष चळवळीला प्राधान्य दिले."[04] यशवंतराव चव्हाण यांनी केंद्रीय संरक्षण मंत्री पदाचा कार्यभार स्विकारल्यानंतर परराष्ट्र धोरण ठरवतांना अलिप्ततावादी चळवळीला व तिच्या तत्वांना प्राधान्य दिले. भारताचे परराष्ट्रमंत्री म्हणून यशवंतराव चव्हाण यांनी अलिप्ततावादाच्या भूमिकेसंदर्भात म्हटलेले आहे की, "अलिप्ततावादाच्या भूमिकेवरून स्वतंत्र व पुरोगामी परराष्ट्रनीती आखण्याचे मूलभूत तत्व भारताने स्वीकारले आहे व त्याचे निर्धारपूर्वक पालनही केले आहे."[05] परराष्ट्रमंत्री म्हणून यशवंतराव चव्हाण यांनी भारताचे परराष्ट्र धोरण ठरवतांना अलिप्ततावादाच्या स्वतंत्र भूमिकेचे निर्धारपूर्वक पालन करून अलिप्ततावादी चळवळीला बळ प्राप्त करून दिले.

भारताच्या परराष्ट्र धोरणाच्या मार्गदर्शक मूलभूत तत्वांच्यासंदर्भात यशवंतराव चव्हाण म्हणतात की, "जागतिक शांततेच्या प्रस्थापनेसाठी क्रियाशील राहणे, सर्व देशांशी सहजीवनाच्या आणि सहकार्याच्या भूमिकेवरून संबंध प्रस्थापित करणे, समान आणि न्याय्य अर्थव्यवस्था उभारण्यासाठी प्रयत्नशील असणे आणि जगात जेथे कोठे स्वातंत्र्य आणि मानवी प्रतिष्ठान यासाठी संघर्ष चालू असेल, त्याला मनःपूर्वक पाठिंबा देणे, ही आपल्या परराष्ट्रीय धोरणाची मार्गदर्शक मूलतत्त्वे आहेत. आपल्या सांस्कृतिक परंपरेचा आणि स्वातंत्र्य संग्रामाचा तोच वारसा आहे."[06] भारताच्या समृद्ध संस्कृतीचे आणि स्वातंत्र्यसंग्रामातील उदात्त आदर्शाचे प्रतिबिंब आपल्या देशाच्या परराष्ट्र धोरणातून अंमलात आणण्याचे कार्य यशवंतरावांनी परराष्ट्रमंत्री म्हणून केले. जागतिक शांतता, शांततामय सहजीवन, आंतरराष्ट्रीय सहकार्य, मानवी प्रतिष्ठेची जपवणूक, समान व न्याय अर्थव्यवस्था, स्वातंत्र्यासाठीच्या संघर्षाला पाठिंबा इ. बाबतीत भारताचे परराष्ट्र धोरण सकारात्मक असल्याचे यामधून यशवंतराव चव्हाण स्पष्ट करतात. अलिप्ततावादी चळवळीच्या भूमिकेसंदर्भात यशवंतराव चव्हाण म्हणतात की, "नव्याने मुक्त झालेल्या देशांचे स्वातंत्र्य जतन करण्यात परतंत्र देशातील स्वातंत्र्यसंग्रामांना बळ पुरवण्यात आणि साम्राज्यवाद, वसाहतवाद, वर्णवाद यांच्याविरुद्धचा लढयांना पाठिंबा देण्यात अलिप्ततावादी

Rankranti Multidisciplinary Research Journal ISSN: 2454-8731

चळवळीने मोठीच भूमिका बजावली आहे."[07] आंतरराष्ट्रीय स्तरावर अलिप्ततावादी चळवळीने वसाहतवाद, साम्राज्यवाद, वंशवाद, वर्णीय पक्षपात इ. च्या निर्मूलनात तसेच नवस्वतंत्र राष्ट्रांचे स्वातंत्र्य जतन करण्यात आणि साम्राज्यवादाची झळ पोहोचलेल्या परतंत्र देशांमधील स्वातंत्र्य चळवळीला सामर्थ्य मिळवून देण्यात महत्त्वाची भूमिका पार पाडल्याचे यशवंतराव चव्हाण प्रतिपादन करतात. जागतिक शांतता प्रस्थापित करण्यामध्ये अलिप्ततावादी चळवळीने बजावलेल्या भूमिकेच्यासंदर्भात यशवंतराव चव्हाण म्हणतात की, "जागतिक शांतता आणि स्थैर्य कायम ठेवण्याच्या कार्यात या आंदोलनाने मोठाच वाटा उचललेला आहे."[08] दुसऱ्या महायुद्धानंतर जागतिक राजकारणाचे द्विध्रुवीकरण झाल्यानंतर प्रत्येक राष्ट्राने लष्करी सामर्थ्य वाढविण्याची स्पर्धा सुरू केलेली होती. विविध देशांकडून लष्करी संघटने आणि करार केले जात होते. अशा पार्श्वभूमीवर जागतिक स्थिरता आणि शांतता धोक्यात आलेली होती. अशा परिस्थितीत अलिप्ततावादी चळवळीचा उदय झाल्यामुळे जगाची विभागणी परस्परविरोधी दोन गटात न होता जागतिक शांतता व स्थिरता कायम राहण्यास मदत झाली. थोडक्यात जागतिक शांतता व स्थिरता प्रस्थापित करण्यात अलिप्ततावादी चळवळीचे योगदान महत्त्वपूर्ण ठरल्याचे यशवंतराव चव्हाण निसंदिग्धपणे स्पष्ट करतात. यशवंतराव चव्हाण अलिप्ततावादी चळवळीच्या यशाविषयी म्हणतात की,"परदेशांकडून येणाऱ्या दबावाचा विचार करण्याची शक्ती या आंदोलनाने नवस्वतंत्र देशांना पुरवली, ही तर आंदोलनाच्या दृष्टीने जमेची बाजू आहे."[09] आंतरराष्ट्रीय राजकारणात अमेरिका वा रशियाच्या गटात सामील न होता तसेच त्यांच्या कोणत्याही दबावाला बळी न पडण्याचे बळ अलिप्ततावादी चळवळीने नवीन स्वतंत्र झालेल्या राष्ट्रांना दिले, हे या अलिप्ततावादी चळवळीचे मोठे यश असल्याचे यशवंतराव चव्हाण स्पष्ट करतात. वसाहतवादाच्या उच्चाटणात अलिप्ततावादी चळवळीने पार पाडलेल्या भूमिकेबाबत यशवंतराव चव्हाण म्हणतात की," वसाहतवादाच्या जोखडाखाली खितपत पडलेल्या देशांना स्वतंत्र होण्याची प्रेरणा दिली, ही अलिप्ततावादाची महायुद्धोत्तर काळातील अत्यंत महत्त्वाची

Rankranti Multidisciplinary Research Journal ISSN: 2454-8731

फलश्रुती म्हटली पाहिजे."[10] साम्राज्यवादी राष्ट्रांच्या वसाहतवादाला रोखण्याची प्रेरणा देण्याचे कार्य वसाहतवादाची शिकार झालेल्या राष्ट्रांना देऊन महत्त्वाची भूमिका अलिप्ततावादी चळवळीने जागतिक महायुद्धानंतरच्या काळात केली.

"प्रत्येक राष्ट्राला आणि समाजाला आपल्या विकासाचा मार्ग स्वतंत्रपणे अनुसरण्याचा अधिकार आहे. हे अलिप्ततावादाचे प्रमुख सूत्र असल्यामुळे या आंदोलनात सहभागी झालेले देश आपल्या अंतर्गत कारभारामध्ये परराष्ट्रांकडून होत असणारा हस्तक्षेप मोठ्या विश्वासाने आणि निर्धाराने रोखू शकतात."[11] जगातील बलाढ्य शक्तींनी नवस्वतंत्र देशांना मांडलिक बनवण्यासाठी त्या देशांमध्ये गोंधळ व अराजक निर्माण करुन त्यांच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप केलेला आहे. मात्र अलिप्ततावादी चळवळीने नवस्वतंत्र राष्ट्रांना स्वतंत्रपणे वावरण्यासाठी व्यासपीठ मिळवून दिल्यामुळे ते आपल्या अंतर्गत कारभारात इतर राष्ट्रांकडून होणारा हस्तक्षेप थांबवू शकतात, असा आत्मविश्वास या चळवळीने नवस्वतंत्र राष्ट्रात निर्माण केल्याचे यशवंतराव चव्हाण स्पष्ट करतात. अलिप्ततावादी चळवळीच्या विधायक योगदानाबाबत यशवंतराव चव्हाण म्हणतात की, "लष्करी करार आणि आघाड्या यांच्या किंवा वसाहतवादी आणि साम्राज्यवादी शक्तींच्या धोक्यांपासून नवस्वतंत्र देशांना सुरक्षित ठेवण्याचे कार्य केवळ अलिप्ततावादाने पार पाडले आहे, असे नसून या आंदोलनाने राष्ट्रीय स्वातंत्र्याचे जतन आणि जागतिक शांततेची ग्वाही ही विधायक कामगिरी बजावलेली आहे."[12] अलिप्ततावादी चळवळीने गटबाजी करणाऱ्या साम्राज्यवादी प्रवृत्तीपासून नवस्वतंत्र राष्ट्राचे रक्षण करण्याबरोबरच त्यांच्या स्वातंत्र्याचे आणि जागतिक शांततेची हमी त्यांना मिळवून दिल्याचे यशवंतराव चव्हाण स्पष्ट करतात.

अलिप्ततावादी चळवळीच्या व्यापकतेसंदर्भात यशवंतराव चव्हाण म्हणतात की, "सुरुवातीपासूनच अलिप्तता ही केवळ एकपदरी संकल्पनाच नव्हती. अनेक मूलभूत घटकांना सामावून घेणारी अशी ती अनेकपदरी संकल्पना आहे."[13] अलिप्ततावाद ही संकुचित चळवळ नसून ती एक व्यापक चळवळ आहे. या चळवळीत जागतिक शांततेचे बरोबरच शांततामय सहजीवन, परस्पर

(148)



सहकार्य, परस्परांच्या अंतर्गत कारभारात निरहस्तक्षेप, वसाहतवाद, साम्राज्यवाद, वंशवाद, वर्णीय पक्षपाताला विरोध, नवस्वतंत्र राष्ट्रांचे स्वातंत्र्य रक्षण, स्वयंनिर्णयासह स्वयंपूर्णतेवर भर, उपासमार, रोगराई, अज्ञान अशा वाईट स्थितीतून राष्ट्रांची सुटका करणे, परतंत्र राष्ट्रातील स्वातंत्र्यसंग्रामांना पाठिंबा देणे, मानवी प्रतिष्ठा वाढवणे, शस्त्रास्त्र स्पर्धेला आळा घालून नि:शस्त्रिकरणाला प्रोत्साहन देणे इ. विविध आघाड्यांवर कार्य केलेले आहे. त्याचप्रमाणे अलिप्ततावादी संकल्पना अधिक स्पष्ट करताना यशवंतराव चव्हाण म्हणतात की, "अलिप्ततावाद ही अकरणात्मक, स्थितिशील किंवा नकारात्मक संकल्पना नाही."[14] अलिप्ततावादाची संकल्पना ही तत्कालीन जागतिक राजकारणाचे अपत्य आहे. आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर ही चळवळ अकरणात्मक, स्थितिशील वा नकारात्मक भूमिका घेणारी नव्हती तर न्याय-अन्याय, योग्य-अयोग्य यामध्ये भेद करून नि:पक्षपातीपणे सकारात्मकतेने कार्य करणारी संकल्पना होती. यशवंतराव चव्हाण अलिप्ततावादी चळवळीच्या सामर्थ्याविषयी म्हणतात की, "किती देश या चळवळीत सहभागी झालेले आहेत वा होत आहेत, यावर या चळवळीचे सामर्थ्य अवलंबून राहणार नाही; तर अलिप्ततावादी देशांची एकजूट आणि परस्पर सहकार्य यावरही ही चळवळ बलवान होणार आहे."[15] अलिप्ततावादी चळवळीची शक्ती ही या चळवळीत सहभागी झालेल्या राष्ट्रांच्या संख्येवर अवलंबून नाही, तर अलिप्ततावादी राष्ट्रातील एकता आणि परस्पर सहकार्यावर अवलंबून असल्याचे यशवंतराव चव्हाण अधोरेखित करतात. कोलंबो येथे अलिप्ततावादी राष्ट्रांच्या पाचव्या शिखर परिषदेला मिळालेल्या वाढत्या पाठिंब्याबाबत या परिषदेत भारताचे परराष्ट्रमंत्री म्हणून सहभागी झालेले यशवंतराव चव्हाण त्याबाबत म्हणतात की, "शांततामय सहजीवनाची तत्वे हाच आंतरराष्ट्रीय संबंधाचा पाया असला पाहिजे, या अलिप्ततावादी आंदोलनाच्या मूलभूत भूमिकेला जागतिक लोकसमूहाकडून व्यापक पाठिंबा लाभला आहे."[16] आंतरराष्ट्रीय स्तरावर राष्ट्रा-राष्ट्रात परस्पर संबंध प्रस्थापित करतांना ती शांततामय सहजीवनावर आधारित असावी, या अलिप्ततावादी राष्ट्रांच्या भूमिकेला दिवसेंदिवस

वाढणारा पाठिंबा हीच या चळवळीच्या यशाची पावती असल्याचे यशवंतराव चव्हाण स्पष्ट करतात. अलिप्ततावादी चळवळ वाढवण्याबाबत उपाय सुचवतांना भारताचे तत्कालीन परराष्ट्रमंत्री यशवंतराव चव्हाण म्हणतात की, "अलिप्ततावादी देशांनी परस्परातील सहकार्य वाढवले तर जागतिक शांततेचे रक्षण करण्याची या आंदोलनाची क्षमता निश्चितच वृद्धिंगत होईल."[17] जागतिक शांतता वाढवण्यासाठी अलिप्ततावादी राष्ट्रांनी परस्पर सहकार्याची गती वाढवणे आवश्यक असल्याचे यशवंतराव चव्हाण प्रतिपादित करतात. अशाप्रकारे यशवंतराव चव्हाण यांनी भारताचे परराष्ट्र मंत्री असतांना भारताच्या परराष्ट्रीय धोरणातून अलिप्ततावादी चळवळीला प्रोत्साहन देण्यात महत्त्वाची भूमिका बजावलेली आहे.

**निष्कर्ष (Conclusions):**

१) भारताचे परराष्ट्रमंत्री म्हणून यशवंतराव चव्हाण यांनी अलिप्ततावादी चळवळीला प्रोत्साहन दिले.

२) राष्ट्रा-राष्ट्रातील शांततामय सहजीवन आणि परस्पर सहकार्यासाठी अलिप्ततावादी चळवळ आवश्यक असल्याचे यशवंतराव चव्हाण प्रतिपादन करतात.

३) जगातील नवस्वतंत्र राष्ट्रांच्या स्वातंत्र्य रक्षणासाठी अलिप्ततावादी चळवळ उपयुक्त ठरल्याचे यशवंतराव चव्हाण यांनी स्पष्ट केले आहे.

४) जगातील वसाहतवादी, साम्राज्यवादी, वर्णवादी शक्तींना रोखण्यात अलिप्ततावादी चळवळीने मोलाची भूमिका बजावल्याचे यशवंतराव चव्हाण प्रतिपादन करतात.

५) नवस्वतंत्र राष्ट्रांना आपल्या अंतर्गत कारभारातील बाह्य हस्तक्षेप रोखण्यासाठी अलिप्ततावादी चळवळीने बळ दिल्याचे यशवंतराव चव्हाण स्पष्ट करतात.

६) अलिप्ततावादी धोरणामुळे नवस्वतंत्र देशांना परकीय राष्ट्रांकडून येणारा दबाव झुगारून देण्याची शक्ती प्राप्त करून दिल्याचे यशवंतराव चव्हाण अधोरेखित करतात.

Rankranti Multidisciplinary Research Journal ISSN: 2454-8731

७) अलिप्ततावादी चळवळीने जागतिक शांतता व स्थिरता राखण्यात मोठी भूमिका पार पाडल्याचे यशवंतराव चव्हाण प्रतिपादन करतात.

८) अलिप्ततावादी संकल्पना ही बहुआयामी संकल्पना असल्याचे यशवंतराव चव्हाण स्पष्ट करतात.

९) यशवंतराव चव्हाण अलिप्ततावादाकडे मानवतेच्या भूमिकेतून पाहतात.

१०) अलिप्ततावाद ही एक सकारात्मक संकल्पना असल्याचे यशवंतराव चव्हाण स्पष्ट करतात.

११) अलिप्ततावादी चळवळीने नवस्वतंत्र राष्ट्रात आत्मविश्वास निर्माण करून त्यांचे स्वत्व जागृत करण्यात महत्वाची भूमिका बजावल्याचे यशवंतराव चव्हाण अधोरेखित करतात.

**संदर्भसूची (Bibliography):**


1. बोराडे रा. रं., (अध्यक्ष), महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, पंडित जवाहरलाल नेहरू-व्यक्ती आणि कार्य, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, प्रथमावृत्ती, मे-2002, पृष्ठ क्रमांक-169.
2. कित्ता, पृष्ठ क्रमांक-168.
3. चव्हाण यशवंतराव, भूमिका-यशवंतराव चव्हाण, रोहन प्रकाशन, पुणे, नवीन विशेष जन आवृत्ती जानेवारी- 2013, पृष्ठ क्रमांक-181.
4. खैरनार प्राचार्य डॉ. अशोक, सोनवणे प्रा. कांतीलाल, जाधव डॉ. सुधाकर, (संपादक), महाराष्ट्राच्या विकासात यशवंतराव चव्हाण यांची भूमिका व कार्य, अथर्व पब्लिकेशन्स, जळगाव, प्रथमावृत्ती, मार्च 2013, पृष्ठ क्रमांक-277 ते 278.
5. उपरोक्त-3, पृष्ठ क्रमांक - 181.
6. कित्ता, पृष्ठ क्रमांक-185.
7. कित्ता, पृष्ठ क्रमांक-189.
8. कित्ता, पृष्ठ क्रमांक-193.

9. किल्ला, पृष्ठ क्रमांक-194.

10. किल्ला, पृष्ठ क्रमांक-195.

11. किल्ला, पृष्ठ क्रमांक-194.

12. किल्ला, पृष्ठ क्रमांक-194.

13. किल्ला, पृष्ठ क्रमांक-188.

14. किल्ला, पृष्ठ क्रमांक-194.

15. किल्ला, पृष्ठ क्रमांक-189.

16. किल्ला, पृष्ठ क्रमांक-196.

17. किल्ला, पृष्ठ क्रमांक-196.

(152)

RNI MAHMAR.43768/18/12/2013.TC

ISSN No. 2454-8731 MONTHLY PEER REVIEWED JOURNAL

# Rankranti Multidisciplinary Research Journal




*Chief Editor*
**Dr. Umesh B. Pujari**

*Executive Editor*
**Dr.. Amit H. Raut**

ATTESTED BY
PRINCIPAL

**Vol.6, Issue : VII, July, 2020**

Chaitanya Prakashan, Nanded - 431606

Contact: 9763308333, 9011107939,

email – rmrjournal@gmail.com

153



Vol.6, Issue : VII.

JULY 2020

Chaitanya Prakashan &

Rankranti Multidisciplinary Research Journal

चैतन्य प्रकाशन व रणक्रांती मल्टीडिसिप्लेनरी रिसर्च जरनल

© All Copy Right Reserve to Publication

ISSN NO. 2454 - 8731

RNI MAHMAR.43768/18/12/2013.TC

Address

Snehanand Nivas Nanded 431606

Contact:

9763308333, 9011107939

Email - rmrjouranal@gmail.com

Printers:

Price: Free

PRESIDENT OF EDITORIAL BOARD & REVIEW COMMITTEE

Dr. Saheb Khandare

Practitioners of folklore and abstract culture

| Guidance | Guidance |
|---|---|
| Dr. Narendra Deshmukh<br>S. P. Pune Univrsity, Pune | Dr. H. J. Narke<br>Principal, V.P.S.P's Art, Commerce & Science College, Kannad Aurangabad |

EDITORIAL BODY

| | |
|---|---|
| Dr. Pramod Padwal<br>Banras Hindu Univarsity, Varansi<br>Uttar Pradesh | Dr. Sanjay Karndikar<br>The Maharaja Sayajirao University of Baroda, Baroda, Gujrat |
| Dr. Sneha S. Mahambre<br>Government College, Sankhli, Goa | Dr. Taher Pathan<br>Alighar Muslim University Alighar, Uttar Pradesh |
| Dr. Manik Chavan<br>Gulbarga University, Kulbargi - 585106, Karnataka | Dr. Manisha S. Nesarkar<br>Rani Chennamma Univerisy Belgavi Karantka |

| | | |
|---|---|---|
| Pri. Dr. Rashmi Gupta<br>Gyaneshwari Shiksha Mahavidyalay Dindori, M.P. | Dr. Vitthal H. Jambale<br>Swami Ramanand Teerth Marathwada, University, Nanded, Dist. Nanded | Dr. Z. A .Pathan<br>Art's, Comm. & Science College, Badnaprur Dist. Jalna |

Rankranti Multidisciplinary Research Journal ISSN: 2454-8731


| | | |
|---|---|---|
| **Dr. Prashant Sonvne**<br>KBC North Maharashtra University, Jalgoan, Maharashta | **Dr. Lalit Adhane**<br>Muktanand Mhavidyalay,Gangagapur Dist. Aurangabad | **Dr. Umesh Mundhe**<br>**Rashtramata Indira Gandhi Mahavidyaly, Jalna Dist. Jalna** |
| **Prin. Dr. Dada Markad**<br>**Shri Harihareshwar Art's & Science College, Koradgoan, Tq. Pathardi, Dist. Ahamadnagar** | **Principal. Dr. Chandu K. Poptkar**<br>Kumbhalkar College of Social-work, Wardha Tq. & Dist. Wardha | **Dr. Changdeo Mundhe**<br>Godawri Arts Jr. & Sr. College, Ambad Dist. Jalna |
| **Dr. Kalidas M. Bhange**<br>A. B. Mahavidyalay Devgoan Rangari, Aurangabad | **Dr. Milind B. Bachute**<br>**R.C.Patel College Shirpur, Dist. Dhule** | **Dr. Sajay Kumar Panchal**<br>**Chief Editor Sahitya Sudha Research Journal** |

REVIEW COMMITTEE

| | | |
|---|---|---|
| **Dr. Ramchandra M. Bhise**<br>**Digmbar Bindu** Mahavidyalay, Bhokar S. **R.T.M. U. N., Dist. Nanded** | **Dr. Sharad Meshram**<br>S. S. Jaiswal College Arjuni-Morgoan Gondia Dist. Gondia | **Asst. Prof. Madan Jadhav**<br>Godawri Arts Jr. & Sr. College, Ambad Dist. Jalna |
| **Dr. Maroti Tegampre**<br>Godawri Arts Jr. & Sr. College, Ambad Dist. Jalna | **Asst. Prof. S. P. Gutte**<br>Shivaji College Kandhar, Tq. Kandhar Dist. Nanded | **Dr. D. N. Raut**<br>Shahid Bhagat Singh College Killari, Dist. Laur |
| **Dr. M.R. Kadam**<br>Shivaji College Kandhar, Tq. Kandhar Dist. Nanded | **Dr. N. V. Singapure**<br>**Sharda College, Parbhani, Dist. Parbhani** | **Dr. N. M. Palwade**<br>B. Raghunath College, Parbhani, Tq. & Dist. Parbhani |
| **Dr. Ganesh V. Lokhande**<br>R. B. O. Narayanrao Borake College, Shrirampur, Dist. Ahamadnagar | **Dr. Umakant S. Gaikwad**<br>Art's & Science College Chincholi, (Li) Tq. Kannad, Dist. Aurangabad | **Dr. Devanand Ambhure**<br>Sarswati Social- Work College, Washim Tq. Washim, Dist. Washim |

155



# अनुक्रमणिका


| अ.क्र. | संशोधन विषय | लेखकाचे नाव | पान क्र. |
|---|---|---|---|
| 1 | भारतीय लोकसंख्यावाढ : परिणाम आणि उपाय | डॉ. राजेंद्र बगाटे | 01 - 11 |
| 2 | भारतीय लोकशाही समोरील आव्हाने | डॉ. बाबासाहेब त्रिंबक मोताळे | 12 - 18 |
| 3 | मुस्लिम मराठी साहित्याचा स – किरण | प्रा. साजिद के. शाह | 19 - 27 |
| 4 | नेहरूवाद : नरहर कुरुंदकरांचा दृष्टीकोन | प्रा. डॉ. राजेश चालिकावार , | 28 - 37 |
| 5 | दलित कांदबरी: पूर्वस्थिती सद्यःस्थिती | प्रा. डॉ. अनिल बोपचे | 38 - 43 |
| 6 | भारतीय स्त्री जीवन : काल आणि आज | प्रा. डॉ. संजीवनी कांबळे | 44 - 48 |
| 7 | किशोरांच्या लैंगिक अभिवृत्तीचा अभ्यास | डॉ. गणेश लोखंडे,<br>गणेश खामकर | 49 - 53 |
| 8 | कोविड संक्रमणात महाराष्ट्रातील स्थलांतरीत बांधकामगारांच्या समस्यांचा अभ्यास | डॉ. शिवाजी पाते व<br>गंगाधर गायकवाड | 54 - 61 |
| 9 | संत साहित्यातील पर्यावरण विषयक विचार | डॉ. सुवर्णा जाधव | 62 - 65 |
| 10 | बालगुन्हेगारी : एक सामाजिक समस्या | डॉ. खेमराज पाटील | 66 - 73 |
| 11 | विक्रमोर्वशियम् आणि उपजीव्य यांच्या कथाभागाचा तौलनिक अभ्यास | डॉ. मंजुश्री नेव्हल | 74 - 80 |
| 12 | संत शिरोमणी सावता महाराजांचे शैक्षणिक विचार एक दृष्टिक्षेप | डॉ. मनोज कांता बोराटे | 81 - 84 |
| 13 | मराठवाडा व वाढत्या बेरोजगारीचे परिणाम | श्री सचिन खेडकर<br>डॉ. रविंद्र विखार | 85 - 92 |
| 14 | मराठी राजकीय नाटक : एक चिकित्सा | प्रा. संदिप कदम | 93 - 100 |
| 15 | तथागत गौतम बुध्द : कार्य आणि तत्वज्ञान | डॉ. सुरेश खोब्रागडे | 101 - 109 |
| 16 | स्त्री–लोकगीते : स्वरूप–विशेष | डॉ. उमेश मुंढे | 110 - 117 |
| 17 | इतिहास कालीन वास्तुकलेचा अजोड नमुना साताराचा अजिंक्यतारा किल्ला :–एक दृष्टिक्षेप | डॉ. वंदना शिंदे | 118 - 125 |
| 18 | कोविड–19 मुळे क्षतिग्रस्त झालेल्या भारतीय अर्थव्यवस्थेचे मंथन – एक अभ्यास | प्रा. जगदिश कुवर | 126 - 131 |
| 19 | विज्ञानकथा: प्रेरणा–प्रयोजन व वैशिष्ट्ये | डॉ. धनवे विलास दिगंबर | 132 - 135 |
| 20 | कर्मवीर दादासाहेब गायकवाड आणि भूमीहिनांचे सत्याग्रह | डॉ. भूषण हिरभगत | 136 - 143 |
| 21 | महाराष्ट्रातील मनरेगा योजनेचा आढावा (इ. स. 2020–20) | डॉ. सोनाजी पतंगे व<br>गायकवाड गंगागौरी | 144 - 155 |

# भारतीय लोकशाहीसमोरील आव्हाने

प्रा. डॉ. बाबासाहेब त्रिंबक मोताळे,
सहाय्यक प्राध्यापक-राज्यशास्त्र विभाग,
स्व.अण्णासाहेब आर.डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालय, म्हसदी.ता. साक्री, जि. धुळे.

**सारांश (Abstract):**

'लोकशाही' म्हणजे 'सहजीवनाचा उत्तम शासन प्रकार' आहे. कारण लोकशाहीची मुळे ही परस्पर सामाजिक संबंधातच आढळतात. भारतीय लोकशाही जात, धर्म, पंथ, भाषा, प्रदेश, संस्कृती इ. प्रकारच्या सामाजिक संबंधातील विविधतेमुळे एकीकडे वैविध्यपूर्ण व समृद्ध झालेली असली तरी दुसऱ्या बाजूला मात्र यामुळे सक्षम भारतीय लोकशाहीचा प्रवास खडतर बनलेला आहे. राष्ट्रहिताऐवजी स्वहिताचा आज संकुचितपणे विचार केला जात असल्यामुळे भारतीय लोकशाही आतून पोखरली जात आहे. भारतीय लोकशाहीमध्ये जातीय राजकारणातून 'व्होटबँके'चा उदय झालेला आहे 'जातीच्या व्होटबँक' लोकशाहीला घातक ठरत आहेत. भारतीय लोकशाहीत राजकीय पक्षांमध्ये व्यक्तिपूजा महत्वपूर्ण मानले जाते, जी लोकशाही सिद्धांताविरोधी आहे. याशिवाय भारतीय लोकशाहीसमोर मतदारांची उदासीनता, मतदारामधील अज्ञान-निरक्षरता, मतदानाची कमी टक्केवारी, राजकीय नेत्यांची असंसदीय-अशोभनीय वक्तव्य, मतदारांचे वर्तन प्रभावित करणारे विविध घटक, राजकारणातील घराणेशाही, राजकारणातील वाढते गुन्हेगारीकरण, वाढत्या दहशतवादी-नक्षलवादी कारवाया, नोकरशहांची अकार्यक्षमता, वाढता भ्रष्टाचार, सिद्धांतविहीन आघाड्या, मताधिकाराच्या गोपनीयतेचा होणारा भंग, राजकीय नेते व पक्षांमधील वाढत चाललेली पक्षांतर प्रवृत्ती इ. विविध आव्हाने उभी आहेत. प्रस्तुत संशोधन लेखात भारतीय लोकशाहीसमोरील विविध आव्हानांचा आढावा घेऊन त्या आव्हानांवर उपाययोजना सुचवण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

**मूळशब्द (Keywords):**

**प्रस्तावना (Introduction):**

भारतीय लोकशाही जगातील सर्वात मोठी लोकशाही म्हणून ओळखली जाते. मात्र असे असले तरीही ही लोकशाही सध्या विविध आव्हानांच्या विळख्यात अडकलेली आहे. 'लोकशाही' हा समाजाच्या 'समग्र परिवर्तनाचा विचार' आहे. समाजपरिवर्तनाचा विचार पूर्णपणे प्रत्यक्षात आणण्यासाठी आणि भारतीय लोकशाहीला अधिक सक्षम करण्यासाठी लोकशाहीला विविध आव्हानांच्या विळख्यातून मुक्त करणे काळाची गरज

Ramkranti Multidisciplinary Research Journal ISSN: 2454-8731

यशवंतराव चव्हाण यांची भूमिका ज्याप्रमाणे महाराष्ट्राच्या जडणघडणीमध्ये महत्त्वपूर्ण ठरलेली आहे, त्याप्रमाणेच त्यांची भारताच्या राष्ट्रीय राजकारणातील विविध पदांवरील भूमिकाही महत्त्वपूर्ण ठरलेली आहे. पंडित नेहरू पंतप्रधान असतांना २० ऑक्टोबर १९६२ रोजी चीनने भारतावर आक्रमण केले. या युद्धात भारताचा पराभव झाल्यामुळे तत्कालीन संरक्षण मंत्री कृष्ण मेनन यांनी आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा दिलेला होता. "१९६२ मध्ये पंडित नेहरूंनी यशवंतराव चव्हाण यांची संरक्षण मंत्री पदावर नियुक्ती केली."[०१] चीनकडून भारताच्या झालेल्या पराभवाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान पंडित नेहरूंच्या निर्देशानुसार तत्कालीन राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी यशवंतराव चव्हाण यांना २२ नोव्हेंबर १९६२ रोजी संरक्षण मंत्री पदाची शपथ दिली. तत्कालीन संरक्षणमंत्री कृष्ण मेनन यांनी चीनकडून झालेल्या पराभवामुळे राजीनामा दिल्यानंतर पंतप्रधान पंडित नेहरू म्हणाले होते की," अब महाराष्ट्र का मराठा देश की रक्षा करेगा |"[०२] भारत संकटात असतांना महाराष्ट्राच्या राजकारणातून यशवंतराव चव्हाण यांना दिल्लीला बोलावून त्यांच्या खांद्यावर संरक्षण मंत्रिपदाची जबाबदारी देण्यात आली. यशवंतराव चव्हाण यांची भारताच्या संरक्षण मंत्री पदावर नियुक्ती केल्याच्या घटनेचे वर्णन अनेकांनी 'हिमालयाच्या मदतीला सह्याद्री धावून गेला', अशा शब्दांमध्ये केलेले आहे. 'कृष्णाकाठ' या आपल्या आत्मचरित्रात यशवंतराव चव्हाण म्हणतात की," लोकसभेसाठी १९६३ साली नाशिक जिल्ह्यातून मी निवडणूक लढवली. तेव्हा मी बिनविरोध निवडून आलो. परंतु त्यामुळे लोकांमध्ये प्रचारासाठी जाण्याचे कारण पडले नाही व जनसंपर्क आला नाही, ही त्या निवडणुकीतील एक उणीव मला भासली."[०३] यशवंतराव चव्हाण यांची केंद्रीय संरक्षण मंत्री पदावर नियुक्ती झाल्यामुळे त्यांना संसदेचे सदस्य होणे अनिवार्य होते, म्हणून १९६३ च्या प्रारंभी झालेल्या लोकसभा निवडणुकीत नाशिक मतदारसंघातून त्यांची बिनविरोध निवड झाली, मात्र बिनविरोध निवड झ ाल्यामुळे जनतेशी नाळ असणाऱ्या या नेत्याला प्रचाराच्या निमित्ताने जनसंपर्क साधता आलेला नव्हता, याची खंतही त्यांच्या आत्मचरित्रातून व्यक्त होते. १ मे १९६० रोजी संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर महाराष्ट्र दिनी झालेल्या सोहळ्यातील भाषणात पंडित नेहरूंच्या उपस्थित यशवंतराव चव्हाण म्हणाले होते की," मराठी भाषिकांचा जवळ जे देण्यासारखे आहे, ते उदात्त आहे, त्याचा त्याग हा भारतासाठी करावा लागला तरी करू. कारण भारत राहील तर महाराष्ट्र राहील, भारत मोठा झाला तर तोही मोठा होईल."[०४] यशवंतरावांच्या या भाषणातून त्यांची राष्ट्रीयत्वाची आणि राष्ट्रसेवेची भावना ओळखूनच पंडित नेहरूंनी संरक्षण खात्याची जबाबदारी त्यांच्यावर विश्वासाने सोपवली होती.

यशवंतराव चव्हाण यांनी संरक्षण मंत्रीपदाची धुरा सांभाळत आपल्या कारकिर्दीला सुरुवात करतांना नेफा व लडाखच्या युद्धभूमीला भेट देऊन चीनकडून झालेल्या पराभवानंतर युद्धोत्तर परिस्थितीची माहिती घेतली. "तुम्हाला जर शत्रूचा पराभव करावयाचा असेल, तर प्रथम शत्रू समजावून घ्या."[०५] या एका चिनी युद्ध अभ्यासकाच्या मताशी यशवंतराव चव्हाण यांनी पूर्णपणे सहमत राहून आपल्या संरक्षण खात्याच्या कार्याला सुरुवात केली. शत्रूचा पूर्ण अभ्यास केल्याशिवाय त्याचा पराभव करणे शक्य नाही, हे जाणून घेऊन यशवंतराव चव्हाण यांनी आपल्या संरक्षणविषयक भूमिकेला आरंभ केला. "यशवंतरावांनी रोज सकाळी साडेनऊ वाजता लष्कराच्या तिन्ही दलाच्या प्रमुखांची बैठक घेऊन त्यांच्याशी चर्चा करण्याचा उपक्रम सुरू केला. या चर्चेचा मोठा लाभ संरक्षणविषयक समस्या समजण्यासाठी झाला." [०६]

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal | E-ISSN : 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.625 (2019) | Special Issue 246 | April - 2020
Peer Reviewed-Referred & Indexed Journal

चीनकडून युद्धात झालेल्या पराभवाची कारणमीमांसा करतांना विविध उपाय यशवंतराव चव्हाण यांनी केले. त्यातील लष्कर प्रमुखांशी चर्चा करण्याच्या उपायामुळे संरक्षण मंत्रालय व तिन्ही सैन्यदलातील परस्पर द्वेषाची, बेदिलीची परिस्थिती नाहीशी करून, त्यांच्या समस्या सोडवून संरक्षण दलांना एकत्रित करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य यशवंतराव चव्हाण यांनी केले. १९६२ मध्ये चीनकडून झालेल्या पराभवाच्या पार्श्वभूमीवर पाकिस्तान भारताला युद्धाची भीती दाखवत होता. त्यावेळी यशवंतराव चव्हाण म्हणाले होते की, "आम्हाला केवळ शेजारी देशांशीच नव्हे, तर जगातील प्रत्येक देशांशी मैत्रीचे संबंध निर्माण करण्याची इच्छा आहे, परंतु एखादा देश जर मैत्रीची बोलणे चालू असतांनाच लष्कराचे भय दाखवून आम्हाला धमकावण्याचा प्रयत्न करत असेल, तर आम्ही कोणापुढेही नमते न घेता आक्रमणाचा खंबीरपणे मुकाबला करू."[०७] याचाच अर्थ कोणी जर युद्धाची भीती दाखवत असेल तर शत्रू राष्ट्राच्या अशा धमक्यांना न घाबरता त्याचा प्रतिकार शक्तीनिशी करण्याची तयारी तत्कालीन संरक्षणमंत्री म्हणून यशवंतराव चव्हाण यांनी ठेवलेली होती. १९६५ मध्ये भारत आणि पाकिस्तान यांच्यात झालेल्या युद्धात भारताने यशवंतराव चव्हाण यांच्या राष्ट्रीय संरक्षण विषयक दूरदृष्टीकोणामुळे पाकिस्तानचा पराभव करण्यात यश मिळवले.

"स्वतंत्र भारताला संरक्षण मंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या काळातच पहिल्यांदाच दशवर्षीय संरक्षण सिद्धांत योजना मिळाली."[०८] यशवंतराव चव्हाण यांनी मांडलेल्या या नवीन योजनेमुळे संरक्षण विभागात परस्पर सामंजस्य-सहकार्य यावर आधारित नवीन युगाला सुरुवात झाली. यशवंतरावांनी या योजनेनुसार संरक्षणविषयक गरजांची यादी तयार करून भारताच्या संरक्षण दलाला अत्याधुनिक आणि सिद्ध करण्याचे कार्य केले. यशवंतराव चव्हाण सैनिक व सैन्य अधिकाऱ्यांच्या इच्छाशक्तीविषयी म्हणतात की, "चीनजवळ अणुबॉम्ब आहेत, पाकिस्तानने अत्याधुनिक शस्त्रास्त्रे पैदा केली आहेत. युद्धामध्ये या शस्त्रास्त्रांना महत्त्व असते, हे तर खरेच, पण आणखी एक हत्यार अधिक महत्त्वाचे असते; ते म्हणजे लढणाऱ्या माणसाची इच्छाशक्ती!"[०९] म्हणून यशवंतरावांनी काश्मीर, राजस्थानच्या सीमेला भेट देऊन, तेथील जवानांच्या प्रशिक्षण केंद्रात जाऊन, त्यांच्याशी संवाद साधून, त्यांच्यासोबत जेवण घेऊन, त्यांचे मनोधैर्य वाढवले. "१९६१-६२ मध्ये भारताच्या संरक्षणाची अंदाजपत्रकातील तरतूद ३१२ कोटींची होती. १९६२-६३ मध्ये ती ८०० कोटी पर्यंत वाढली व नंतरच्या तीन वर्षात ३००० कोटींपर्यंत पोहोचली."[१०] यशवंतराव चव्हाण यांनी दूरदृष्टिकोणातून राष्ट्रीय संरक्षणाची गरज लक्षात घेऊन भारताच्या अंदाजपत्रकामध्ये संरक्षण खर्चाचा टक्का भरघोस वाढवण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले.

भारतीय सैनिकांना धीर देऊन त्यांचे मनोबल उंचावताना यशवंतराव चव्हाण म्हणतात की, "आव्हानांना घाबरले की, सारे काही गमावून बसतो. पण जर का त्यांना धैर्याने तोंड दिले, तर आपण यशस्वी होऊ शकतो. जे वैयक्तिक जीवनाबाबत खरे आहे, तेच राष्ट्राच्या जीवनाबाबतही सत्य आहे."[११] सैनिकांनी कोणत्याही आव्हानांना, संकटांना न घाबरता निर्धारपूर्वक, धैर्याने सामोरे जाण्याच्या सल्ल्यातून यशवंतरावांनी यशाचा मार्ग सांगितलेला आहे. "भारताच्या लष्करी दलात आणि त्याच्या सामर्थ्यात जे इष्ट बदल यशवंतरावांच्या नेतृत्वाखाली घडून आले आणि जो नवा आत्मविश्वास त्यांनी सैन्यदलात प्राप्त करून दिला, तोच त्या (१९६५) युद्धात यश मिळविणारा प्रमुख घटक ठरला."[१२] १९६५ च्या भारत-पाक युद्धात भारताला मिळालेल्या विजयात संरक्षणमंत्री म्हणून यशवंतराव चव्हाण यांची मोलाची भूमिका ठरली. महत्त्वपूर्ण बदल करून यशवंतराव चव्हाण यांनी सैन्यदलाचे मनोबल उंचावले, त्यामुळे भारताला या युद्धात यश प्राप्त झाले. देशनिष्ठा आणि स्वातंत्र्य रक्षणाविषयी यशवंतराव चव्हाण म्हणतात की, "मी देशाचा आहे आणि देश माझा आहे, ही भावना जर आपण प्रत्येक नागरिकात जागृत करू शकलो आणि कोणतीही किंमत द्यावी लागली तरी ती देऊन स्वातंत्र्य जतन केले पाहिजे, असे त्याला वाटायला लागले, तर भारतावर आक्रमण करण्यापूर्वी शत्रूला शंभरवेळा विचार करावा लागेल. हे सामर्थ्य, हा विश्वास ही जाणीव हेच देशाच्या स्वातंत्र्याचे संरक्षण करण्याचे मूलभूत शस्त्र होय."[१३] देशाविषयी आपुलकीची व ममत्वाची भावना निर्माण झाल्यास मिळालेल्या स्वातंत्र्याचे रक्षण करणे

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal | E-ISSN : 2348-7143
Impact Factor - (SJIF) - 6.625 (2019) | April - 2020
Special Issue 246
Peer Reviewed-Referred & Indexed Journal

अवघड नाही. अशा सामर्थ्यशाली देशाकडे वाकडी नजर करताना शत्रू राष्ट्रालाही अनेकदा विचार करावा लागेल, यावर यशवंतरावांना विश्वास होता. देशाच्या स्वयंपूर्णतेबाबत यशवंतराव चव्हाण म्हणतात की, "आपल्याला जर स्वातंत्र्य टिकवायचे असेल, तर आपण स्वयंपूर्ण झाले पाहिजे. स्वयंपूर्णतेतूनच देश समर्थ होऊ शकतो."[१४] महत्प्रयासाने मिळालेले स्वातंत्र्य टिकवायचे असेल तर संरक्षणासह इतर क्षेत्रातही स्वयंपूर्ण होण्यावर यशवंतराव चव्हाण भर देतात. कारण स्वयंपूर्णतेतूनच आपण सामर्थ्यशाली होऊ शकतो, यावर त्यांचा विश्वास होता. स्वयंपूर्णतेचा प्रवास हा लांब पल्ल्याचा असला तरी नियोजनाद्वारे व तांत्रिक क्षमतेचा विकास करून तो गाठला जाऊ शकतो, अशी त्यांची धारणा होती. भारताला सामर्थ्यशाली बनवू इच्छिणारे यशवंतराव चव्हाण यासंदर्भात म्हणतात की, "आपण आपला देश आर्थिक आणि लष्करी दृष्टीने बलिष्ठ करावयास हवा. देशभक्तीची जाणीव सतत प्रज्वलित ठेवायला हवी. आपण या दोन्ही गोष्टी ध्यानात ठेवल्या तर जगातील कोणतीही शक्ती भारताची प्रगती रोखू शकणार नाही."[१५] भारताला आंतरराष्ट्रीय स्तरावर यशवंतराव चव्हाण शक्तिशाली बनवू इच्छित होते. म्हणून त्यांनी देशभक्तीची जाणीव प्रत्येकाने ठेवण्याचे आवाहन केलेले आहे. आर्थिक व लष्करीबाबतीत भारत सामर्थ्यशाली झाल्यास भारताच्या विकासाला कोणीही रोखू शकणार नाही, असा विश्वास यशवंतराव चव्हाण यांना होता. भारताचे संरक्षण मंत्री म्हणून यशवंतराव चव्हाण यांनी देशाचे संरक्षण तर केलेच परंतु शेजारील पाकिस्तानला १९६५ च्या युद्धात पराभूत करून भारताच्या सामर्थ्याचीही जाणीव करून दिली. रशियाच्या ताश्कंद येथे झालेल्या कराराप्रसंगी भारताचे संरक्षणमंत्री म्हणून यशवंतराव चव्हाण उपस्थित होते.त्यावेळी संरक्षण मंत्री म्हणून यशवंतरावांनी घेतलेले निर्णय महत्वपूर्ण व उपयुक्त ठरले. याच काळात अमेरिका, रशिया, इंग्लंड आणि इतर देशांना भेटी देऊन त्यांच्याशना संरक्षणविषयक करार करून दूरदृष्टिकोणातून भारताची संरक्षण सिद्धता वाढवण्यात महत्त्वाची भूमिका त्यांनी पार पाडली. यशवंतराव चव्हाण यांच्या राष्ट्रीय संरक्षणविषयक दृष्टिकोणामुळे भारताच्या लष्करी यंत्रणेचा मुखवटा बदलण्याचे कार्य केले. त्यामुळेच त्यांचा उल्लेख 'युद्धमंत्री' म्हणूनही केला जातो.

**निष्कर्ष (Conclusions):**

१) यशवंतराव चव्हाण यांनी संरक्षण क्षेत्रात स्तुत्य सुधारणा करून इष्ट बदल घडवून आणले.

२) यशवंतराव चव्हाण यांनी भारतीय सैन्यदलात आत्मविश्वास वाढवून त्यांचे मनोबल उंचावण्यात महत्त्वाची भूमिका पार पाडली.

३) यशवंतराव चव्हाण यांनी भारताची संरक्षण सिद्धता वाढवली.

४) यशवंतराव चव्हाण यांनी भारतीय अंदाजपत्रकातील संरक्षण क्षेत्राचा टक्का मोठ्या प्रमाणात वाढवला.

५) यशवंतराव चव्हाण यांनी राष्ट्रीय राजकारणात संरक्षणमंत्री म्हणून स्वतःचा प्रभाव निर्माण केला.

६) यशवंतराव चव्हाण यांचा राष्ट्रीय संरक्षणविषयक दृष्टीकोण सकारात्मक आणि उपयुक्त ठरला.

७) [3] भारताच्या संरक्षण खात्यातील यशवंतराव चव्हाण यांची भूमिका व योगदान मोलाचे ठरले.

८)[3] भारताच्या संरक्षणासंदर्भात संरक्षणशास्त्रातील बारकाव्यांचा अभ्यास करून यशवंतराव चव्हाणांनी भारताला संरक्षणाबाबत सिद्ध केले.

९) यशवंतराव चव्हाण यांच्यात राष्ट्रीयत्वाची भावना ठसून भरलेली होती.

१०) यशवंतराव चव्हाण यांच्या नेतृत्वामुळे १९६५ च्या भारत पाकिस्तान युद्धात भारताने सर्व आघाड्यांवर पराक्रम गाजवला.

११) यशवंतराव चव्हाण यांचा राष्ट्रीय संरक्षणाबाबतचा दृष्टिकोण दूरदृष्टीचा होता.

संदर्भग्रंथ (Reference):

१. खैरनार डॉ. प्राचार्य अशोक, सोनवणे प्रा. कांतीलाल, जाधव डॉ. सुधाकर (संपादक), महाराष्ट्राच्या विकासात यशवंतराव चव्हाण यांची भूमिका व कार्य, जळगाव, अथर्व पब्लिकेशन्स, प्रथमावृत्ती, मार्च- २०१३, पृष्ठ क्रमांक- २७२.

२. कित्ता, पृष्ठ क्रमांक-३००.

३. चव्हाण यशवंतराव, कृष्णाकाठ-यशवंतराव चव्हाण आत्मचरित्र, पुणे, रोहन प्रकाशन, नवीन विशेष जन आवृत्ती, ऑगस्ट-२०१५, पृष्ठ क्रमांक- ३०२.

४. उपरोक्त-१, पृष्ठ क्रमांक-१७२.

५. चव्हाण यशवंतराव, भूमिका-यशवंतराव चव्हाण, पुणे, रोहन प्रकाशन, नवीन विशेष जन आवृत्ती, जानेवारी-२०१३, पृष्ठ क्रमांक-२१.

६. उपरोक्त-१, पृष्ठ क्रमांक-२७४.

७. उपरोक्त-५, पृष्ठ क्रमांक-२३.

८. उपरोक्त-१, पृष्ठ क्रमांक-३००.

९. उपरोक्त-५, पृष्ठ क्रमांक-२६.

१०. उपरोक्त-१, पृष्ठ क्रमांक-२७५.

११. उपरोक्त-५, पृष्ठ क्रमांक-२६.

१२. उपरोक्त-२, पृष्ठ क्रमांक-२७५.

१३. उरोक्त-५, पृष्ठ क्रमांक-२७.

१४. कित्ता, पृष्ठ क्रमांक-२७.

१५. कित्ता, पृष्ठ क्रमांक-२८.

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - IX Issue - II APRIL - JUNE - 2020

MARATHI PART - II

Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.399
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

Attested
Principal
A.D.M.S.P.Sanstha's
Late Annasaheb R.D.Deore
Arts & Science College,
Mhasadi,Tal.Sakri,Dist.

VOLUME - IX, ISSUE - II - APRIL - JUNE - 2020
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI PART - II


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | स्त्री-पुरुष समतेचे पुरस्कर्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर<br>**प्रा. अजित दादू फाळके** | १-३ |
| २ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शिक्षण विषयक विचारांचा आढावा<br>**बांगर आकाश शेषराव** | ४-६ |
| ३ | पत्रकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर<br>**श्री. अरुण लक्ष्मीनारायण घडाते** | ७-१० |
| ४ | कामगार नेते डॉ. बाबासाहेब आंबेडकर<br>**डॉ. देवराव सुखदेवराव मनवर** | ११-१६ |
| ५ | स्त्री-पुरुष समतेचे पुरस्कर्ते - डॉ. बाबासाहेब आंबेडकर<br>**प्रा. डॉ. दिलीप सावंत** | १७-१८ |
| ६ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा शैक्षणिक दृष्टिकोन<br>**डॉ. गणेश क. टाले** | १९-२४ |
| ७ | अर्थतज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर<br>**डॉ. के. पी. पोले** | २५-२८ |
| ८ | समतावादी डॉ. बाबासाहेब आंबेडकर<br>**डॉ. मिलिंदकुमार भिकाजी देवरे** | २९-३३ |
| ९ | भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे दलितेतरांसाठी योगदान<br>**प्रा. डॉ. नारायण नामदेव गावे** | ३४-४० |
| १० | शिक्षणतज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर<br>**नवनाथ वि. नागरे** | ४१-४४ |
| ११ | महामानव, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर<br>**पद्माकर भारतराव काळे** | ४५-४९ |
| १२ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्रीविषयक कार्य<br>**प्रा. डॉ. प्रेमला मुखेडकर** | ५०-५३ |
| १३ | कृषीतज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर<br>**प्रा. डॉ. राजकुमार कि. मून** | ५४-६० |

VOLUME - IX, ISSUE - II - APRIL - JUNE - 2020
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)**

# ८. समतावादी डॉ. बाबासाहेब आंबेडकर

**डॉ. मिलिंदकुमार भिकाजी देवरे**
सहाय्यक प्राध्यापक (मराठी), स्व. अण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालय, म्हसदी, ता. साक्री, जि. धुळे.

**सारांश**

महाराष्ट्रातील सामाजिक क्रांतीच्या चळवळीला अधिक मूलगामी, सर्वव्यापी अन् खोलवर रुजविण्याचा प्रयत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक आणि सांस्कृतिक क्रांतीचा पाया हा समानतेवर आधारित होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे समतावादी कृतीशील विचार अत्यंत महत्वाचे आहेत. डॉ. आंबेडकरांचा विचार केंद्रबिंदू हा सामान्य माणूस आहे आणि माणसाची शोषणापासून सुटका करणे हे त्यांच्या विचारांचे ध्येय आहे. आंबेडकरी विचार हा शोषणाविरुद्ध विद्रोह करणारा व प्रत्यक्ष जीवनातील शोषण व्यावहारिक तत्वाला नाकारणारा विचार आहे. वर्णवादी, अस्पृश्यता, जातीयवादी, स्वर्ग, ईश्वरवादी, अध्यात्मवादी तत्वाला नकार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव ही तत्वे प्रधान मानली. या तत्वांचा उल्लेख त्यांच्या विचारात अनेक ठिकाणी येतो. समाजाला सोसावी लागणारी गुलामगिरी मोडीत काढण्याकरिता मानवी समानता श्रेष्ठ मानली. बहुजन समाजाला समान वागणूक, समान शिक्षण, समान दर्जा, समान संधी मिळाली तरच मानवजातीचा विकास होवू शकतो. डॉ. बाबासाहेबांनी स्त्रीया तसेच दलितांना जीवन जगण्याचा अधिकार प्राप्त करून दिला. शिका, संघटीत व्हा आणि संघर्ष करा या त्रीसूत्रीच्या आधारे आपले कार्य संपूर्ण मानवजातीच्या कल्याणाकरिता अर्पण केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देशाच्या स्वातंत्र्याबरोबरच अन्याय, असमानता आणि शोषणापासून मुक्ती व समानता प्रस्थापित करण्याचा अधिकार देण्यासाठी बहिष्कृत हितकारिणी सभा, सामाजिक समता संघ, पीपल्स एज्यूकेशन सोसायटी, ऑल इंडिया शेड्यूल्ड कास्ट इत्यादी संस्था स्थापन केल्या.

**बीजसंज्ञा -** स्वातंत्र्य, समता, बंधुता, विषमता, अस्पृश्यता, जातीभेद, संविधान, राज्यघटना, जातीव्यवस्था, हिंदू कोड बिल अधिकार

**संशोधनाची उद्दिष्ट्ये**

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे समतावादी विचार अभ्यासणे.
२. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक कार्यावर प्रकाश टाकणे.
३. लिंगभेदावर आधारित सामाजिक व्यवस्थेला विरोध करणे.
४. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची विषमताविरोधी भूमिका समजून घेणे.
५. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मानवता या मूल्यावर प्रकाश टाकणे.

**गृहीतके**

१. भारतीय समाजव्यवस्था ही विषमताधिष्ठीत शोषणाधारित अशा वैविध्यावर आधारलेली आहे.

२. हिंदू धर्मव्यवस्थेने विषमतावादी जीवनमूल्ये बंधनकारक आणि अपरिवर्तनीय मानलेली होती.

३. भारतीय समाज हा मुख्यत: पुरूषप्रधान राहिला आहे. त्यामुळे स्त्री-पुरूष विषमता मोठ्या प्रमाणावर दिसून येते.

४. तत्कालीन समाजावर परंपरेने चालत आलेल्या रूढी, परंपरा, जातीभेद, लिंगभेद या मानवनिर्मित भेदांचे वर्चस्व होते.

५. व्यक्तिस्वातंत्र्य, शिक्षण, समता, न्याय याचा अधिकार स्त्रीया आणि दलितांना नाकारला होता याची डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना खंत होती.

**प्रास्ताविक**

समतेच्या विविध छटा असून त्याचे गुणधर्मही भिन्न आहेत. निसर्गत: व्यक्ती-व्यक्तीमध्ये भिन्नता असली तरी सर्व माणसे आहेत. एकाच मनुष्य जातीचे घटक आहेत. समता हे विवेकता, नैतिकता, सांस्कृतिकता यातून निष्पन्न होणारे एक मूलभूत मानवी मूल्य आहे. व्यक्तीच्या विकासासाठी समतेची गरज आहे. कुवत आणि पात्रतेनुसार सुप्त गुणांचा विकास करण्याची संधी प्रत्येकाला प्राप्त झाली तर एका अर्थाने सर्वसाधारण समता प्रस्थापित झाली असे म्हणता येईल. सर्व माणसे समान मानणे व सर्वांना सारखी वागणूक देणे हा समतेचा अर्थ आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक समतेसाठी जे कार्य कृतीद्वारे केले ते मानवतावादी दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे होते. भारतायसारख्या विषमताधारित समाजव्यवस्थेत सामाजिक न्यायाधिष्ठीत समाज परिवर्तन घडून यावे हा त्यांचा उद्देश होता. त्यांच्या विचाराने भारतातील मानवमुक्तीचा संघर्ष अधिकाधिक व्यापक व्हावा अशी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची अपेक्षा होती. समाजातील शोषित, वंचित, उपेक्षित समूहातील नागरिकांना सर्वच प्रकारचा विकास करता येण्यासाठी राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक अधिकार मिळण्याच्या दृष्टीने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारताच्या संविधानात विविध तरतुदी केलेल्या आपणांस दिसून येतील. डॉ. आंबेडकर हे दलित मुक्तीबरोबरच स्त्री-पुरुष समानतेच्या प्रस्थापनेसाठी लढले. ह्या लढ्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून स्त्रीयांचे सामाजिक कायदे निर्माण करून स्त्रीयांना पुरुषांबरोबर समानतेची वागणूक व तिच्या सर्वांगीण प्रगतीची वाट मोकळी करून दिली. हजारो वर्षांपासून दलितांना जी उपेक्षेची, अवहेलनेची, गुलामीची वागणूक मिळत होती ती आंबेडकरांच्या प्रेरणेने थांबली. आंबेडकरांनी दलितांवरील अन्याय, अत्याचार, छळ, कपट, दैन्य थांबवून मानवमुक्ती आणि मानवतावाद प्रस्थापित केला. लोकांना समतेचा मार्ग दाखविला.

**हिंदू कोड बिल आणि समता**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मानवमुक्तीच्या सिध्दांतात आणि कार्यात स्त्री-पुरूष समानतेला महत्त्वपूर्ण स्थान होते. हिंदू समाजातील सगळ्या प्रकारच्या विषमतांपैकी एक म्हणजे स्त्री-पुरूष विषमता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्री स्वातंत्र्याचा पुरस्कार केला. स्त्रीयांच्या वाट्याला आलेले शोषण, दास्यात्वातून मुक्ती व कल्याणासाठी ते अहोरात्र झटत

VOLUME - IX, ISSUE - II - APRIL - JUNE - 2020
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)**

राहिले. स्त्री-पुरुष समानता आणायाची असेल तर स्त्रीला माणूस म्हणून तिचे हक्क व अधिकार दिले गेले पाहिजे. स्त्रीला केवळ घरातच नव्हे तर घराबाहेर जाऊन आपला विकास करण्याचे व्यापक स्वातंत्र्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अपेक्षित होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितले होते की, कोणत्याही समाजाची प्रगती ही त्या समाजातील महिलांची प्रगती किती झाली आहे. यावरून समजते. स्त्रीयांच्या उन्नतीशिवाय कुटुंब, समाज आणि राष्ट्रांच्या उन्नतीचे स्वप्न बघणे अशक्य आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रीयांविषयक समताधिष्ठित जाणीवा आत्मसात करून आयुष्यभर स्त्री सुधारणेचा, स्त्री मुक्तीचा पाठपुरावा केला.

भारतीय स्त्रीयांना हजारो वर्षाच्या विषमतावादी समाजव्यवस्थेच्या भीषण अंधःकारातून बाहेर काढण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संसदेत इ.स. १९५१ साली 'हिंदू कोड बिल' मांडले. भारतीय स्त्रीला धर्म, जात, वेद, पुराणे, उपनिषिदे, कर्मकांड, देव अशा अनेक प्रकारच्या गुलामगिरीतून मुक्त करून पुरुषांच्या बरोबरीने समान हक्क देणारे हे बिल होते. डॉ. आंबेडकरांनी स्त्रीयांना चौदाव्या, पंधराव्या कलमानुसार स्त्री-पुरुष समानतेचा अधिकार दिला. हिंदू कोड बिलाच्या माध्यमातून स्त्रीयांच्या समान हक्कांवर शिक्कामोर्तब झाले. प्रत्येक क्षेत्रात समान हक्क आणि दर्जा मिळावा यासाठी कायद्याच्या तरतुदीतून स्त्री गुलामगिरी, स्त्री दास्यत्व नष्ट करण्याचा प्रयत्न केला. हिंदू कोड बिलामुळे स्त्रीयांवरील अनेक अत्याचारांना वाचा फोडली आहे. स्त्रीयांबाबतचा पारंपारिक दृष्टिकोन संपावा आणि स्त्रीयांच्या हिताचे कायदे करून त्यांनी स्त्रीयांना आत्मनिर्भर करण्याचा प्रयत्न केला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रीयांना कायदेशीर समता, स्वातंत्र्य व सामाजिक न्याय देण्याचे अतिशय महत्वपूर्ण कार्य केले. घटनेत कलम चौदा पासून एकवीस पर्यंत त्यांना स्त्रीयांना कायद्याने समता आणि सामाजिक न्याय मिळवून घेण्याच्या तरतूदी करून ठेवल्या आहेत. तसेच स्त्रीयांना वडिलांच्या संपत्तीत मुलाइतकाच समान वाटा मिळावा, विधवा स्त्रीयांना पतीच्या संपत्तीत वाटा मिळावा. स्त्रीयांनी घटस्फोट देणे, पोटगी मिळणे, दत्तक घेणे, वारसा निश्चिती करणे, आंतरजातीय विवाहास मान्यता, स्त्री-पुरुष समानता, हुंडा विरोध, बालविवाह विरोध अशा कायदेविषयक तरतुदी केल्या.

**डॉ. आंबेडकर आणि सामाजिक परिवर्तन**

प्राचीन भारतातील जीवन धर्म प्रवण होते. धर्माचे तत्त्वज्ञान आणि आचार यात समन्वय नसल्याने सामाजिक तेढ निर्माण झालेली होती. पिढ्यानपिढ्या एकत्र नांदत असलेला समाज यामुळे दुभंगला गेला. माणसाची मने एकसंघ राहिली नाहीत. चातुर्वर्ण्य समाजव्यवस्था आणि गावगाडा यामुळे समाजात उच्चनिचता निर्माण झाली. व्यवसायानुसार बारा बलुतेदारी सिद्ध झाली. धर्म आणि आचरण यातील तत्त्वे या समाजास अशी चौकट ठरली की तेथील जगणे असह्य होऊ लागले. अन्याय, अत्याचार, शोषण, अशिक्षितपणा, पारतंत्र्य यांनी माणसाला दिशाहीन केले. सामाजिक दास्य, गुलामगिरी व शोषणाचे प्रमुख आश्रयस्थान धर्म यांचा पगडा समाजावर बसला होता. अनुवंशिक श्रेष्ठत्व मानले जात होते. सामाजिक उच्चनीचता ईश्वरी संकेतानुसार किंवा पूर्वजन्मीच्या पापपुण्यावर अवलंबून असते, हा विचार समाजाच्या मनी रुजला होता. समाज, अज्ञान, दारिद्र्य, भोळेपणा, अंधश्रद्धा, बुवाबाजी, फलज्योतिष, ईश्वरी कर्मकांड यामध्ये गुरफटला होता. या

पार्श्वभूमीवर संपूर्ण मानवजातीच्या कल्याणासाठी जातीभेद निर्मूलन, स्वातंत्र्य, समता प्रस्थापित करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आयुष्यभर संघर्ष केला. सामाजिक परिवर्तन घडवून आणण्याचा कसोशीने प्रयत्न केला.

भारतीय समाज हा जाती, धर्म आणि पंथीय विचारांचा गुलाम असलेला समाज आहे. जातीची असमानता हे भारतातील जातीसंस्थेचे एक आगळेवेगळे रूप आहे किंवा वैशिष्ट्ये आहे. परंतु अगदी वरच्या पातळीपासून ते अगदी खालच्या पातळीपर्यंत अनेक टप्प्यांत उच्चनीचतेची भावना प्रस्थापित झालेली होती. वरिष्ठ जातीकडून अपमानित होणाऱ्या जातीभेदावरील त्यांच्यापेक्षा कनिष्ठ पातळीवरील जातींना खालच्या पातळीकडे जातांना तिरस्काराचे प्रमाण अधिकाधिक वाढत जाई तर मानाचे प्रमाण हे क्रमाक्रमाने घटत जात असे. भारतात जात हा शोषणाचा आधार आहे त्यामुळे विषमता मोठ्या प्रमाणावर दिसते. ही विषमतामुलक व्यवस्था उलथवून समानता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केला. समाजव्यवस्थेचा परिवर्तनाचा विचार यात अभिप्रेत आहेत.

समतेच्या तत्वाचे उल्लेख डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारात अनेक ठिकाणी येतात. त्यांचा मुख्य रोख विषमतेविरुद्ध होता. हिंदू समाजातील जातीव्यवस्था हा त्यांना समता आणि स्वातंत्र्य यांच्या प्रस्थापनेतला मुख्य अडथळा वाटत होता. त्यामुळे जातींची निर्मिती कशी झाली, त्याचे उच्चाटन कसे करता येईल या प्रश्नांची चर्चा त्यांनी सातत्याने केलेली दिसते. जातीव्यवस्थेमुळे हिंदू समाज विस्कळीत झाला आहे आणि जातींच्या श्रेणीबद्ध रचनेमुळे विविध जातींनी एकत्र येऊन या व्यवस्थेचा मुकाबला करणं अशक्य आहे, असं ते म्हणतात. प्रामुख्याने हिंदू समाजाचा विषमताधिष्ठित व्यवहार आणि त्याला मान्यता देणारी विषमतामूलक हिंदू तत्वज्ञान यांच्यावर प्रकाश टाकणारे लेखन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले आहे.

समतेचे स्वरूप स्पष्ट करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिहितात, "समतावाद्यांवर मोठ्या शिष्टपणाने असा आक्षेप घेण्यात येतो की, निसर्गातच मुळी समता नाही, मग ती कोण, कशी प्रस्थापित करू शकणार ? जगात कोणत्या ना कोणत्या रूपाने थोडी बहुत विषमता केव्हाही राहणारच. याविषयी त्यांनी आपले तात्विक विवेचन केले आहे." डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यांच्या समाजात त्यांनी वैचारिक क्रांती केली. सामाजिक व आर्थिक समतेच्या दिशेने जाणे त्यांना महत्वाचे वाटत होते. समतेचे मूल्य जनमानसात रुजविण्यासाठी त्यांनी अपार कष्ट केले. सामाजिक व आर्थिक स्तरावरील विषमता नष्ट करणारी धोरणे सरकारने आखली पाहिजेत ही त्यांनी भूमिका होती.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, "समता हे सार्वजनिक नीतीचे एक मुख्य तत्व आहे. राजकीय, धार्मिक, सामाजिक व आर्थिक बाबतीत समतेचे तत्व लागू करणे म्हणजे समाजरचना नीतीच्या पायावर करणेच होय." विशेषतः जो समाज शोषित आहे, त्यांना शिक्षण मिळाले पाहिजे असा आग्रह त्यांनी धरला. विद्या व शिक्षण हाच समाज विकासाचा खरा पाया आहे. निव्वळ समतेपेक्षा समान दर्जा, समान संधी, न्याय्य वाटप यांचे महत्व बाबासाहेबांना जास्त वाटत होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानातील समतावादी, जातीभेदविरहित प्रजासत्ताक राष्ट्र घडविण्याचे स्वप्न पाहिले होते.

VOLUME - IX, ISSUE - II - APRIL - JUNE - 2020
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)**

राहिले. स्त्री-पुरुष समानता आणायाची असेल तर स्त्रीला माणूस म्हणून तिचे हक्क व अधिकार दिले गेले पाहिजे. स्त्रीला केवळ घरातच नव्हे तर घराबाहेर जाऊन आपला विकास करण्याचे व्यापक स्वातंत्र्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अपेक्षित होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितले होते की, कोणत्याही समाजाची प्रगती ही त्या समाजातील महिलांची प्रगती किती झाली आहे. यावरून समजते. स्त्रीयांच्या उन्नतीशिवाय कुटुंब, समाज आणि राष्ट्रांच्या उन्नतीचे स्वप्न बघणे अशक्य आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रीयाविषयक समताधिष्ठित जाणीवा आत्मसात करून आयुष्यभर स्त्री सुधारणेचा, स्त्री मुक्तीचा पाठपुरावा केला.

भारतीय स्त्रीयांना हजारो वर्षाच्या विषमतावादी समाजव्यवस्थेच्या भीषण अंधःकारातून बाहेर काढण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संसदेत इ.स. १९५१ साली 'हिंदू कोड बिल' मांडले. भारतीय स्त्रीला धर्म, जात, वेद, पुराणे, उपनिषिदे, कर्मकांड, देव अशा अनेक प्रकारच्या गुलामगिरीतून मुक्त करून पुरुषांच्या बरोबरीने समान हक्क देणारे हे बिल होते. डॉ. आंबेडकरांनी स्त्रीयांना चौदाव्या, पंधराव्या कलमानुसार स्त्री-पुरुष समानतेचा अधिकार दिला. हिंदू कोड बिलाच्या माध्यमातून स्त्रीयांच्या समान हक्कांवर शिक्कामोर्तब झाले. प्रत्येक क्षेत्रात समान हक्क आणि दर्जा मिळावा यासाठी कायद्याच्या तरतुदीतून स्त्री गुलामगिरी, स्त्री दास्यत्व नष्ट करण्याचा प्रयत्न केला. हिंदू कोड बिलामुळे स्त्रीयांवरील अनेक अत्याचारांना वाचा फोडली आहे. स्त्रीयांबाबतचा पारंपारिक दृष्टिकोन संपावा आणि स्त्रीयांच्या हिताचे कायदे करून त्यांनी स्त्रीयांना आत्मनिर्भर करण्याचा प्रयत्न केला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रीयांना कायदेशीर समता, स्वातंत्र्य व सामाजिक न्याय देण्याचे अतिशय महत्वपूर्ण कार्य केले. घटनेत कलम चौदा पासून एकवीस पर्यंत त्यांना स्त्रीयांना कायद्याने समता आणि सामाजिक न्याय मिळवून घेण्याच्या तरतूदी करून ठेवल्या आहेत. तसेच स्त्रीयांना वडिलांच्या संपत्तीत मुलाइतकाच समान वाटा मिळावा, विधवा स्त्रीयांना पतीच्या संपत्तीत वाटा मिळावा. स्त्रीयांनी घटस्फोट देणे, पोटगी मिळणे, दत्तक घेणे, वारसा निश्चिती करणे, आंतरजातीय विवाहास मान्यता, स्त्री-पुरुष समानता, हुंडा विरोध, बालविवाह विरोध अशा कायदेविषयक तरतुदी केल्या.

**डॉ. आंबेडकर आणि सामाजिक परिवर्तन**

प्राचीन भारतातील जीवन धर्म प्रवण होते. धर्माचे तत्वज्ञान आणि आचार यात समन्वय नसल्याने सामाजिक तेढ निर्माण झालेली होती. पिढ्यानपिढ्या एकत्र नांदत असलेला समाज यामुळे दुभंगला गेला. माणसाची मने एकसंघ राहिली नाहीत. चातुर्वर्ण्य समाजव्यवस्था आणि गावगाडा यामुळे समाजात उच्चनिचता निर्माण झाली. व्यवसायानुसार बारा बलुतेदारी सिद्ध झाली. धर्म आणि आचरण यातील तत्वे या समाजास अशी चौकट ठरली की तेथील जगणे असह्य होऊ लागले. अन्याय, अत्याचार, शोषण, अशिक्षितपणा, पारतंत्र्य यांनी माणसाला दिशाहीन केले. सामाजिक दास्य, गुलामगिरी व शोषणाचे प्रमुख आश्रयस्थान धर्म यांचा पगडा समाजावर बसला होता. अनुवंशिक श्रेष्ठत्व मानले जात होते. सामाजिक उच्चनीचता ईश्वरी संकेतानुसार किंवा पूर्वजन्मीच्या पापपुण्यावर अवलंबून असते, हा विचार समाजाच्या मनी रुजला होता. समाज, अज्ञान, दारिद्र्य, भोंदूपणा, अंधश्रद्धा, बुवाबाजी, फलज्योतिष, ईश्वरी कर्मकांड यामध्ये गुरफटला होता. या

ते साकार करण्यासाठी संविधानातील स्वातंत्र्य, समता, विश्वबंधुत्व, सामाजिक न्याय, राष्ट्रीय एकात्मता ही सांविधानिक मूल्य जोपासली पाहिजेत असा त्यांचा आग्रह होता.

निष्कर्ष

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आयुष्यभर जे विचार मांडले, ते विचार मातीतून माणूस घडवायला कारणीभूत ठरले. त्यांनी आयुष्यभर विषमतेविरुद्ध लढा दिला. आपल्या वाणी, लेखणीने जातीव्यवस्थेवर जोरदार हल्ला केला.

२. शोषिताच्या दृष्टीने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू समाजव्यवस्थेचे भौतिक विश्लेषण केले.

३. समाजातील अन्याय, विषमता, दैन्य यांचे अतिशय भेदक चित्रण होऊन त्याला वाचा फुटली.

४. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्रत्यक्ष कृतीतून चळवळ उभारून स्त्रीयांना मानसन्मानाचे स्थान मिळवून देण्यात अत्यंत महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

५. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समता, स्वातंत्र्य, न्याय आणि बंधुतेसाठी आयुष्यभर लढा दिला. दलितांना माणूसपण मिळवून दिले. स्त्री शूद्रांना त्यांच्या हक्क अधिकाराची जाणीव करून दिली.

६. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे 'समानतावादी' तत्वज्ञान दलित साहित्यात उमटतांना दिसते.

७. आंबेडकरवादी साहित्य हे समता व व्यक्तिस्वातंत्र्याचा पुरस्कार करणारे साहित्य आहे.

संदर्भग्रंथ

१. रानडे प्रतिभा (२००३) स्त्री प्रश्नांची चर्चा, राजहंस प्रकाशन, पुणे.
२. साने गीता (२००१) भारतीय स्त्रीजीवन, मौज प्रकाशन, मुंबई.
३. कुरुंदकर नरहर (१९९०) डॉ. बाबासाहेब आंबेडकर : एक मुल्यांकन, सविता प्रकाशन, औरंगाबाद.
४. डॉ. बी. आर. जोशी (१९९५) समाजवादी डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सुगावा प्रकाशन, पुणे.
५. फडके भालचंद्र - दलित साहित्य वेदना व विद्रोह
६. खैरमोडे चांगदेव - डॉ. आंबेडकर आणि हिंदू कोड बिल
७. कीर धनंजय - डॉ. बाबासाहेब आंबेडकर

Drishtikon
*(UGC Care Journal)*

ISSN 0975-119X
Vol-12-Issue-7-2020
Special Issue

# जागतिकीकरण आणि मराठी साहित्य

डॉ. मिलिंदकुमार भिकाजी देवरे

स्व.अण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालय,म्हसदी

ता. साक्री जि.धुळे (महाराष्ट्र)

milindkumardeore@gmail.com

सारांश :-

नव्वदीच्या दशकापासून देशाच्या आणि महाराष्ट्राच्या एकूण वास्तवात महत्वाचे बदल होऊ लागले. मुक्त अर्थव्यवस्था, उदारीकरण, खाजगीकरण आणि जागतिकीकरणाने संपूर्ण वातावरण ढवळून निघाले. जागतिकीकरण ही अर्थशास्त्रीय संकल्पना असून तिने जीवनाच्या सर्वच क्षेत्रांना व्यापले आहे. जागतिकीकरणाची लाट संपूर्ण जगात पसरल्याने समाजात अनेक स्थित्यंतरे घडून आली. जागतिकीकरणाच्या दृश्य - अदृश्य परिणामांमुळे समाजजीवनात मूलगामी बदल झाले आहेत. जागतिकीकरणाच्या संकल्पनेचा विचार प्रामुख्याने आणि प्राधान्याने आर्थिक संदर्भात केला जात असला तरी या संकल्पनेचा संबंध साहित्य , कला, विज्ञान, संस्कृती, धर्म यांच्यासोबतही जोडला गेला आहे. नव्वदोत्तर कालखंडात लिहिल्या जात असलेल्या समकालीन साहित्याला अन्य संदर्भासह जागतिकीकरणाचा विशेष संदर्भ आहे. जागतिकीकरणाच्या प्रभावातून नव्या बदललेल्या परिस्थितीत साहित्याने जे वेगवेगळे स्वरूप धारण केले त्याचा विमर्श होणे गरजेचे आहे. जागतिकीकरणाचा सामाजिक व सांस्कृतिक जीवनावर परिणाम झालेला दिसतो. त्यामुळे समाजातील परस्परपूरकतेची भावना बऱ्याच अंशी नष्ट होऊन व्यक्ती आणि समूहात संकुचित आणि आत्मकेंद्री वृत्ती बळावली. सामाजिक मूल्यांमध्येही संघर्ष निर्माण झाला. जागतिकीकरणाने एकूणच मानवी मूल्य व्यवस्थेचे निकषच



Attested
Principal
A.D.M.S.P.Sanstha's
Late Annasaheb R.D.Deore
Arts & Science College,
Mhasadi,Tal.Sakri,Dist.Dhule.

ISSN 0975-119X
Vol-12-Issue-7-2020
Special Issue

बदलून गेले. या सगळ्या बदलांचे प्रतिबिंब नव्वदोत्तर मराठी साहित्यात पडलेले दिसते. जागतिकीकरणामुळे समाजमन ढवळून निघाले आहे. त्याचे पडसाद मराठी साहित्यात उमटले आहेत.

**बीज शब्द** :- जागतिकीकरण, समाज, समाजकारण, अर्थकारण, मूल्यव्यवस्था, मानवी जीवन, नव्वदोत्तर मराठी साहित्य, सामाजिक व सांस्कृतिक बदल.

**उद्दिष्टे**-

१) जागतिकीकरणामुळे मराठी साहित्याचे बदलते रूप जाणून घेणे.

२) जागतिकीकरणामुळे साहित्यिकांच्या लेखनात झालेल्या बदलांचा अभ्यास करणे.

३) जागतिकीकरणामुळे मानवी मूल्यांची होणारी पडझड समजून घेणे.

४) जागतिकीकरणामुळे साहित्यावर काय परिणाम झाला याचा शोध घेणे.

**संशोधन पद्धती**-

समाजशास्त्रीय पद्धत

वाङ:मयीन पद्धत

**गृहीतके**-

१) जागतिकीकरण ही संकल्पना सर्वंकष मानवी प्रभाव पडताना दिसते.

२) साहित्य हे मानवी जीवनाच्या घडणी तील अत्यंत महत्त्वपूर्ण अंग आहे.

३) जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे घडून आलेल्या प्रचंड सामाजिक बदलांचे प्रतिबिंब मराठी साहित्यात उमटलेले दिसते.

Copyright@authors

Drishtikon
*(UGC Care Journal)*

ISSN 0975-119X
Vol-12-Issue-7-2020
Special Issue

**प्रस्तावना:-**

विविध देशांमध्ये माहिती तंत्रज्ञान भांडवल लोक बाजारपेठ वस्तू यांचा मुक्त संचार आणि देवाण-घेवाण म्हणजे जागतिकीकरण होय. आजचं जागतिकीकरण हे माहिती तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे खूप जलद वाढल-आहे. जागतिकीकरणाच्या आर्थिक बदलातून अनेक सामाजिक सांस्कृतिक व राजकीय बदल घडून एक नवीन व्यवस्था अस्तित्वात आली. त्यामुळे जागतिकीकरणाचे अनेक दुष्परिणाम भोगावे लागत आहेत. 1990 नंतरच्या जागतिकीकरणाच्या रेट्यात मध्यमवर्गीय संवेदना बोथट झाल्या. जागतिकीकरणाच्या रेट्यातून 'एकसांस्कृतिकतानिर्माण करण्याचा प्रयत्न होत आहे. उपभोगवादी संस्कृती ने जन्म घेतला आहे. जागतिकीकरणातून सामूहिक नैराश्याची भावना व अलिप्ततेची मानसिकता निर्माण झाली आहे. 1990 नंतरचे जग म्हणजे एकमेकांवर कुरघोडी करण्याचा काळ. धर्मांधतेत वाढ , दंगली, बेरोजगारी, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, जातीय हिंसाचार यांसोबतच मानवी मूल्यांच्या घोर विटंबनेचा आणि समाजाच्या तुटलेपणाचा काळ. सवंग मनोरंजन बोथट जाणिवा बदललेली जीवनशैली , बुद्धिजीवी व कष्टकरी श्रमिकांमधील तुटक संवाद हे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य यासंदर्भात नोंदवता येईल. विशेष आर्थिक क्षेत्र (SEZ) खाजगीकरणाच्या धोरणांमुळे धरणग्रस्त, विस्थापितांच्या आत्महत्या, नैसर्गिक साधन संपत्ती वर होत जाणारा प्रस्थापितांचा अधिकार या सर्वांचा ग्रामीण संवेदनशीलतेवर मोठा प्रभाव पडलेला आहे.

जागतिकीकरणाचा समाजव्यवस्थेवर झालेल्या विपरीत परिणामांनी सामान्य माणूस हादरून गेला ; लेखकही त्याला अपवाद राहिला नाही. साहित्य हा समाजाचा आरसा आहे , असे म्हटले जाते , साहित्यात समाजजीवनाचे प्रतिबिंब उमटत असते. साहित्यिकांची बांधीलकी समाजजीवनाशी असते. समाजाची मूल्यव्यवस्था, वैचारिक आणि परिवर्तनवादी घटना हा साहित्याचा आंतरिक गाभा असल्यामुळे जागतिकीकरणाचा प्रभाव हा साहित्यावर झालेला जाणवतो.

Copyright@authors

Drishtikon
(UGC Care Journal)
ISSN 0975-119X
Vol-12-Issue-7-2020
Special Issue

**जागतिकीकरणाचा मराठी साहित्यावर झालेला परिणाम:-**

जागतिकीकरणाचा सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनावर मोठा परिणाम झालेला दिसतो. कुटुंब व्यवस्था, विवाह, स्त्री - पुरुष संबंध, जाती - जनजाती, भाषा इत्यादी सामाजिक घटकांवर मोठा प्रभाव पडत आहे. लहान मुले , तरुण वर्ग आणि वृद्धांचे जीवनमान प्रभावित झालेले आहे. ग्राहकवादाच्या प्रभावातून नवसमाज आकार घेत आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या क्रांतीमुळे लोकांच्या जीवनात आमूलाग्र परिवर्तन घडून आले आहे. सांस्कृतिक आकृतीबंध बदलला असून अमेरिकन कपडे, चायनीज अन्न, फ्रेंच व्हिस्की, इंग्लिश पॉप संगीत या गोष्टी नित्य परिचयाच्या झालेल्या आहेत. त्यातून नव्या नागरी समाजाची निर्मिती होत आहे. तंत्रज्ञानवादी युगामुळे मानवी जीवन अधिकच कृत्रिम बनले आहे. त्यामुळे त्यांच्या संवेदना बोथट झालेल्या दिसतात. संस्कृतीचे बाजारीकरण घडून आल्यामुळे मूल्यांचा ऱ्हास झाला. माणसाकडे वस्तू म्हणून बघितले जाऊ लागले आजच्या तंत्रज्ञानवादी वा भौतिकवादी जगामुळे त्याची धारणा, समाजाविषयीची मानसिकता सातत्याने बदलत आहे. त्यामुळे तो आत्यंतिक स्वकेंद्री बनत चालला आहे. समाजाचे विद्रूपीकरण, मानवी जीवनातील भीषणता, तुटलेपणा, मूल्यहीनता यामुळे एकूणच समाज व व्यक्ती यांचे आरोग्य धोक्यात आले. माणूस आणि समाजाच्या स्वास्थ्यासाठी केवळ भौतिक प्रगती पुरेशी नाही.

"जागतिकीकरणाचा आजचा चेहरा अमानवी आहे. यात देवान-घेवाण नाही. ताकदवान धनदांडगे देतील ते बाकीच्यांनी घ्यायचं. त्यांच्या तालावर नाचायचं. जगा म्हणतील तोवर जगायचं. त्यांना तुम्ही उपयोगाचे राहिला नाहीत तर मरायचं. दुनियेच्या प्रगतीसाठी गरिबांनी तेवढा त्याग केला पाहिजे. गरीब देशांनी आपल्या सामाजिक व्यवस्था धनदांडग्यांसाठी खुल्या करायच्या." रंगनाथ पठारे यांचे हे विधान अत्यंत बोलके आहे. जागतिकीकरणाने गरीब-श्रीमंत मजूर - भांडवलदार अशी दरी निर्माण केली. जागतिकीकरणाचा स्पष्टपणे जाणवणारा परिणाम म्हणजे शहर व गाव यामध्ये वाढत चाललेली सांस्कृतिक

Copyright©authors

ISSN 0975-119X
Vol-12-Issue-7-2020
Special Issue

दरी हे आहे. जागतिकीकरणाने माणसा-माणसांमध्ये तेढ निर्माण केली. पर्यायाने माणूस एकटा पडत चालला. याचा परिणाम असुरक्षितता आणि हिंस्रता वाढण्यात झाला.ही हिंस्रता फक्त माणसा पुरती मर्यादित राहिली नाही , तिने पर्यावरणाचाही समतोल ढासळला आहे. साहाजिकच गावोगाव राजकीय , सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक दिवाळखोरी प्रत्ययास येऊ लागली आहे. या सर्व प्रक्रियेचा मराठी साहित्यावर परिणाम झाला. मूल्यहीनता आणि हिंस्रता घेऊन आलेल्या जागतिकीकरणाने ग्रामीण जीवनाला चंगळवाद आणि भोगवादाची चटक लावली. आदिवासी, दलित, भटके बलुतेदार, छोटे शेतकरी शेतमजूर या जागतिकीकरणाचे बळी ठरत आहेत. त्याचे पारंपरिक व्यवसाय संपवून त्याचे एकूणच अस्तित्व संपण्याची प्रक्रिया घडत आहे.

जागतिकीकरणामुळे मराठी साहित्यात जे बदल झाले त्यामध्ये कथा , कादंबरी, नाटक, कविता, ललित साहित्य यांचा समावेश होतो. जागतिकीकरणामुळे मानवी मूल्यांची होणारी पडझड , माणूस ऐवजी पैशाला प्राप्त झालेले महत्त्व, उपभोक्तावाद, चंगळवाद, बहुराष्ट्रीय कंपन्यांचे वर्चस्व, त्यातून निर्माण होणारा साम्राज्यवाद, जीवघेणी स्पर्धा , बाजार संस्कृती यामुळे बदलणारी सामाजिक , राजकीय, सांस्कृतिक, आर्थिक परिस्थितीचे चित्रण मराठी साहित्यातून साहित्यिकांनी ठळकपणे रेखाटलेले आहे.

जयंत पवार यांची कथा ही प्रामुख्याने गिरणी कामगारांच्या प्रश्नांना वाचा फोडणारी आहे. गिरणी कामगारांच्या संपामुळे कित्येक कुटुंबाची भयावह दुर्दशा झाली. मुले अंडरवर्ल्ड कडे वळाली. बेरोजगारी वाढली. अनेक कुटुंबाचा उदरनिर्वाहाचा , पोटा पाण्याचा प्रश्न उभा राहिला. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत कामगार विस्थापित झाला. याच विषयावर त्यांनी 'अधांतर' हे नाटक देखील लिहिले आहे. नैतिकतेची समाजमान्य कल्पना आणि व्यक्तीच्या मुल्य विवेकातून निर्माण झालेली नैतिकता यांच्यातील चिरंतन संघर्ष त्यांच्या साहित्यातून व्यक्त होतो. जागतिकीकरणाचा फार मोठा गंभीर परिणाम ग्रामीण भागातील शेतकरी व शेती व्यवसायावर झालेला दिसून येतो. शेतकऱ्यांची दैन्यावस्था व पारंपरिक मूल्यांची पडझड नव्वदोत्तर

Copyright©authors

ISSN 0975-119X
Vol-12-Issue-7-2020
Special Issue

कादंबरीत चित्रित झालेली आहे. भारतातील मूल्यव्यवस्था , पाश्चात्य विचारसरणी व संस्कृती जागतिकीकरणातून आलेली व्यापारी मूल्ये , वेगवेगळ्या सामाजिक , सांस्कृतिक, धार्मिक, आर्थिक घडामोडींचे पडसाद या काळातील कादंबरीत उमटलेले पाहायला मिळतात. जागतिकीकरणामुळे बदलते ग्रामीण वास्तव, त्यामागील राजकारण, समाजकारण, शेतकरी - कष्टकरी यांची होणारी फरफट, ग्रामीण जीवनातील श्रद्धा-अंधश्रद्धा, मोडलेला गावगाडा, त्याजागी आलेली पंचायत, सहकार संस्था आणि प्रश्न , दुष्काळ हे विषय साहित्यात येऊ लागलेले आहेत. सदानंद देशमुख यांनी 'तहान' व 'बारोमास' या कादंबऱ्यांतून कृषी व्यवस्थेतल समग्र दुःख व्यक्त केले आहे. खेड्यातील बेकारी , निसर्गाचा लहरीपणा, फसवणूक, भ्रष्ट व्यवस्था, दारिद्र्य,पेटू पाहणारा पाणीप्रश्न, अभावग्रस्तता अशा प्रश्नांवर प्रकाश टाकलेला आहे. शेतकरी आत्महत्या, दुष्काळ, बेकारी, भ्रष्टाचार या ग्रामजीवनाला भेडसावणाऱ्या समस्यांचे चित्रण सदानंद देशमुख यांनी केले आहे. राजन गवस यांनी 'ब,बळीचा' या कादंबरीतून शेतकरी, त्याचे जगणे, बदललेले खेडे, त्यांचे ताण यांचे सूक्ष्म चित्रण केले. शंकर सखाराम यांच्या 'एस.ई.झेड' या कादंबरीत रायगड जिल्ह्यातील विस्थापित झालेल्या लोकांनी केलेल्या हिंसक आंदोलनाचे पडसाद उमटले आहेत.

तंत्रज्ञानवादी युगामुळे मानवी जीवन अधिकच कृत्रिम झाले आहे. संस्कारांची कमतरता असल्याने बालपणापासून मुलांची संवेदना बोथट झालेली दिसते. संस्कृतीचे बाजारीकरण घडून आल्यामुळे मूल्यांचा ऱ्हास झालेला दिसतो. कवी अरुण काळे , कवी महेंद्र भवरे , कवी हेमंत दिवटे यांच्या काव्यातून या बदलाचे उत्कट दर्शन घडते. जागतिकीकरणाचा एकूणच मानवी समूहावर होत असलेल्या परिणामांचा वेध उत्तम कांबळे यांनी 'जागतिकीकरण माझी कविता' या काव्यसंग्रहात घेतला आहे.

सारं जग जवळ आलंय म्हणतात
पण माणसं माणसापासून दूर धावताहेत

Copyright©authors

ISSN 0975-119X
Vol-12-Issue-7-2020
Special Issue

रोबोटच्या गळ्यात गळा घालताहेत

माणसाऐवजी कुत्र्यावर

कुत्र्याऐवजी यंत्रावर विश्वास टाकताहेत..

सारेच मोबाईलवर

जमिनीवर कोणीच नाही...

ही ढासळत्या समाजाची वास्तव स्थिती आहे. ही कविता माणसाचे हरवलेपण व्यक्त करते. उद्या माणसाचे अस्तित्व नष्ट होईल की काय ? अशी भीती साऱ्यांच्याच मनात निर्माण होत आहे. समाजातील परस्परपूरक भावना नष्ट होऊन संकुचित आणि आत्मकेंद्री वृत्ती बळावली. या नव्या पर्यावरणात माणसाची भावना , संवेदना, विचार करण्याची शैली , जीवनाविषयीची दृष्टी , कुटुंबातील रक्ताच्या नात्यांबद्दलची दृष्टी, आपल्या मित्रांबद्दलची दृष्टी , एकूणच या सर्व बाबतीत त्यांच्याकडे पाहण्याच्या दृष्टीत आमूलाग्र बदल झालेला आहे. या सर्व नात्यांमधील जिव्हाळा , प्रेम, आपुलकी संपुष्टात आली असून नाती वस्तूत परावर्तित होत आहेत. संस्कृतीचे बाजारीकरण होत आहे आणि मानवी संवेदना रोबोट मध्ये बदलत आहेत. जागतिकीकरणाच्या या प्रक्रियेमुळे मानवाचे भावविश्वच बदलून गेले आहे.

**समारोप:-**

जागतिकीकरण मराठी साहित्याचा एकूणच अभ्यास केल्यानंतर असे जाणवते की , जागतिकीकरणामुळे जग जवळ आले पण माणूस माणसापासून दूर गेला. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने मानवी समूहांना नियंत्रित केले आहे. अर्थकारणातून गतिमान झालेल्या या प्रक्रियेनेमाणसाच्या सामाजिक , सांस्कृतिक जीवनातही नफा तोट्याचे निकष लावले आहेत. तसेच माणसांच्या भावविश्वाचे झालेले बाजारीकरण संस्कृतीला देण्यात आलेली बाजारू मूल्यात्मकता इत्यादी परिणाम जागतिकीकरणामुळे ठळकपणे सांगता

Copyright©authors

ISSN 0975-119X
Vol-12-Issue-7-2020
Special Issue

येतील. नगराची महानगरे झाली, खेडी ओस पडू लागली, शहरात बेकारी, दारिद्र्य, गलिच्छ राहणीमान, झोपडपट्ट्यांची वाढ, घटस्फोट, कौटुंबिक ताणतणाव, राहत्या घरांची समस्या, कामगारांचे संप, मोर्चे, दंगली, राजकारण्यांचे डावपेच, विभक्त कुटुंब पद्धती, पर्यावरणाचे प्रदूषण, यासारख्या जाणीवा साहित्यातून चित्रित होऊ लागल्या. माणसाला जाणवणारे एकाकीपण , संवाद शून्यता, तुटलेपणा, दांभिकता, स्वार्थी वृत्ती, अमानुषता, वर्तनातील अश्लीलता प्रामुख्याने चित्रित होते.

**निष्कर्ष**

१) जागतिकीकरणामुळे निर्माण होणाऱ्या विविध समस्यांची व प्रश्नांची उकल कथा कादंबरी कविता व नाटकातून ठळकपणे जाणवत आहे.

२) जागतिकीकरणामुळे विचार , तत्व, निष्ठा पायदळी तुडविले जात आहे. याचे विवेचन साहित्यातून आविष्कृत होत आहे.

३) जागतिकीकरणामुळे माणूस माणसापासून दुरावत आहे. नात्यांमधील भावनिक ओलावा दिवसेंदिवस कमी होत आहे. धावपळ आणि पैसा एवढेच सूत्र निर्माण होत आहे.

४) साहित्यातून महानगरांमधील वाढती गुन्हेगारी , वाहतुकीच्या समस्या, प्रदूषण, रोजगार, जीवनावश्यक गरजांचा तुटवडा अशा समस्यांचा पाढा व्यक्त होताना दिसतो.

५) जागतिकीकरणामुळे भारतीय साहित्यावर झालेला परिणाम खूप प्रभावी आहे. जागतिकीकरणामुळे साहित्याला एक नवी दिशा मिळाली.

६) जागतिकीकरणाने ग्रामीण जीवन व शहरी जीवन यांच्यातील पूर्वीचे अंतर कमी केले.

Copyright©authors

ISSN 0975-119X
Vol-12-Issue-7-2020
Special Issue

७) ग्रामीण जीवन व्यवहाराला गेले तडे , वेगाने बदलणारी संवेदनशीलता, नात्यांमधील तुटलेपण, वाढत चाललेला बाजारवाद असे समाजाला ग्रासणारे विषय रेखाटून ग्रामीण संवेदनशीलता टिकवण्याचे कार्य साहित्याला करावे लागणार आहे.

**संदर्भ ग्रंथ:-**

१) जागतिकीकरणात मराठी कविता - संपा. उत्तम कांबळे परचुरे प्रकाशन, मुंबई

२) जागतिकीकरण आणि मराठी साहित्य - संपा. प्रा.सुनील शिंदे, डॉ. शरद गायकवाड स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे

३) साहित्य संस्कृती आणि जागतिकीकरण - भालचंद्र नेमाडे लोकवाङ्मय गृह मुंबई

४) जागतिकीकरण आणि मराठी साहित्य - डॉ. नलिनी महाडिक

Copyright@authors